
# माणूस

बुधवार । २४ फेब्रुवारी ७१
चाळीस पैसे




X



शेठ दमानि   रंगा वैद्य

## सोलापूर मतदार संघ : सरळ सामना

## शे. का. प. बालेकिल्ल्यातील तिरंगी लढत

## कुलाबा ? ?

बुधवार २४ फेब्रुवारी १९७१

# माणूस


वर्ष : दहावे
अंक : चौसष्टावा

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

किमत
चाळीस पैसे

वार्षिक वर्गणी
तीस रुपये

परदेशची वर्गणी
साठ रुपये


## सप्रेम नमस्कार...

◘ 'माणूस' बुधवार दिनांक १०।२।७१ च्या 'हे कलकत्ता' या सदरात खालील वाक्ये आढळली. ती बरोबर नाहीत.

'आपलं नाव खानेसुमारीच्या यादीतूनच (Census Roll) काढून टाकावं म्हणजे झालं. कारण त्यावरूनच मतदारांची यादी (Voters' List) तयार होत असते.'

शिरगणती ही दर दहा वर्षांनी होत असते व त्यातील माहिती ही गुप्त स्वरूपाची असते व त्यावरूनच तक्ते तयार केले जातात. मतदारांच्या याद्यांशी शिरगणतीचा काहीएक संबंध नाही. गैरसमज होऊ नये म्हणून हा खुलासा.

१५ फेब्रुवारी १९७१ — अ. ना. भावे, डोंबिवली

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

छोटे बाबू

# प्रतिद्वंद्वी : इंदिरा–अटल

इंदिरा गांधी आणि अटल बिहारी बाजपेई अनुक्रमे महाराष्ट्र व आंध्र आणि उत्तर प्रदेशचे दौरे आटोपून गेल्या सोमवारी (पंधरा फेब्रुवारी) राजधानीत आले, ते बहुधा प्रचंड हुरूप घेऊन. या दौऱ्यात जनमताचा कौल आपल्या बाजूनेच असल्याचा दोघांनाही अनुभव आला म्हणे.

निवडणुकीच्या धामधुमीत 'उसंत' शब्दाला स्थान नाही. दिल्लीत आल्या आल्या जनसंघ आणि सत्तारूढ कॉंग्रेसच्या या नेत्यांनी लगेच प्रत्येकी चार सभा घेऊन टाकल्या. (इंदिरा गांधींना सत्तारूढ कॉंग्रेसची नेता म्हणण्याचे कारण अध्यक्ष जगजीवनराम यांच्या शतपटीने जनता त्यांना मानते असा निदान भास तरी निर्माण झाला आहे. खुद्द या पक्षानेही 'भारताची एकमेव आशा' म्हणून गांधींचीच हाकाटी सुरू केली आहे!)

त्या दृष्टीने हा सोमवार दिल्लीत फार गडबडीचा. दोघांनीही दिल्ली आणि भोवतालच्या खेड्यात सभा घेतल्या.

दोघेही नेते धूर्त. म्हणजे असे की आपण कुणासमोर बोलतो आहे याचे भान दोघांनाही इतके व्यवस्थित होते की कुणीही चाट पडावे.

सरकारी नोकर, शेतकरी-कामकरी आणि व्यापारी अशा तीन गटात आपल्या भावी मतदारांची विभागणी करून दोघांनीही दणकेबाज भाषणे ठोकली.

समाजवाद, गरीबी दूर करणे हे इंदिरा बाईंच्या भाषणाचे मुख्य सूत्र. पण खेडुतांसमोर त्या म्हणाल्या, 'घाबरू नका, विरोधकांच्या प्रचाराला बळी पडू नका. माझा पक्ष तुमच्यावर कोणतेही कर लादणार नाही' तर छोट्या व्यापाऱ्यांसमोर, 'तुमच्यासारख्या छोट्या, कष्टाळू लोकांना त्रास देण्याची कल्पना तरी आमच्या डोक्यात कशी येईल? आम्हाला फक्त बड्या भांडवलदारांविरुद्ध, पैसेवाल्यांविरुद्ध लढा द्यायचा आहे!' शेवटी बिचारे सरकारी नोकर, 'तुमच्या प्रश्नांची, मागण्यांची आम्हाला जाणीव आहे. पण हे प्रश्न सामान्य आहेत. ते

बाजूला ठेवा (आम्हाला मत द्या, आणि) देशात सामाजिक आणि आर्थिक बदल घडविण्यासाठी निष्ठापूर्वक कार्य करा !'

इंदिरा बाईंना एकंदरीत हे तंत्र छान जमते. लोकांच्या हृदयाला हात घालण्यासाठी काय करावे याची त्यांना चांगली कल्पना आहे. 'बँकांचे राष्ट्रीयीकरण करून, झालंच तर तनखे रद्द करून, आम्ही गरीबांच्या कल्याणासाठी झटतो आहोत' 'भांडवलशाही प्रवृत्तींना नको असली तरी सामाजिक क्रांती होत जाणारच आहे, असा सूर धरता धरता 'हे विरोधक माझ्या पिताजींना राजकीय दृष्टया ठार करू पहात होते. तसेच ते आता माझे अगदी शारिरीक मरण पाहू इच्छित आहे' असेही बोलून बाईंनी वातावरण गरम करून टाकलं !

खेड्यातल्या भाषणाला अपेक्षेप्रमाणे चांगला प्रतिसाद मिळाला. सर्वच समातूर आधी उमेदवारांची व इतर नेत्यांची थोडक्यात भाषणं आटोपली की बाईंचे आगमन होत होते. पण या दोन खेड्यात लोकांना जवाहरलाल की बेटी को सुनने की जास्त उत्सुकता होती. बाई येईपर्यंत घोषणांची रंगीत तालीम झाली. त्या आल्या, भाषणाला सुरुवात झाली. दोनदा त्या माईकने दगा दिला. स्थानिक कार्यकर्त्यांना सवय असावी, त्यांच्यापैकी एकाने उठून दोन्ही वेळा त्याला थप्पड लगावली, तेव्हा बेटा पुन: व्यवस्थित काम करायला लागला !

इतकं सगळं असलं तरी आपल्या या पंतप्रधानही कधी कधी भान विसरतात. बेफाम बोलतात. विरोधक मला मारू पहात आहेत, हा एक नमुना. तर एकदा म्हणाल्या, 'लोकशाही वाचवा म्हणणारे विरोधक स्वातंत्र्य संग्रामात कुठे होते ?' वास्तविक हा मुद्दा मागे एकदा घोळून झाला आहे. त्याला जनसंघाने प्रतिप्रश्नही केला होता, 'स्वातंत्र्य युद्धात लढलेल्या नेहरूंची बेटी या उपर तुम्ही तरी काय केलं आहे ? कुठल्या संग्रामांत तुम्ही उडी घेतली ? किती वेळा ब्रिटिशांच्या तुरुंगात गेलात ?'

सर्वच गोंधळ. सामान्य माणूस म्हणतो, आता किती दिवस या गोष्टींचं भांडवल करणार आहात ? तुरुंगाची हवा खाऊन आलं म्हणजेच देश प्रेम का ? त्यावेळचे ते योद्धे आता वृद्ध झाले नाहीत का ?

पंतप्रधानांजवळ नाही ती एक गोष्ट अटल बिहारींजवळ आहे. ती म्हणजे विनोद बुद्धी. हसत हसत विरोधकांना ते उडवून लावू शकतात.

उदाहरणार्थ, एका भाषणात ते म्हणाले, 'राजधानीला जादा बसेसची आवश्यकता आहे म्हणून आमच्या अॅडमिनिस्ट्रेशनने खाजगी बसेस चालू ठेवा अशी सूचना केली. केंद्राने ती फेटाळली. केंद्राला म्हणजेच सत्तारूढ कॉंग्रेसला मी आश्वासन देतो की–की दिल्लीत बसेसची चांगली व्यवस्था केली तरी तुमच्या त्या समाजवादी प्रगतीच्या मार्गावरील वाटचालीला अडथळा होणार नाही !'

नजाफगंजच्या सभेला जरा उशीरच झाला. कारण अगदी जवळच्या नरेला गावी इंदिरा गांधींची सभा होती, तिकडे सगळे लोक गेले होते. ती सभा आटोपली तसे ते इकडे धावले. थोडा गोंधळ झाला, तो शांत करताना वाजपेयी म्हणाले, ' बसून घ्या, गाय आणि वासरू असा त्रास देणारच ! '

त्यांचा मुख्य जोर अर्थातच पाकचे विमान प्रकरण, खाजगी मालमत्ता विसर्जित करण्यासंबंधीचे आणि कम्युनिस्ट लीगशी हात मिळवणी करण्याचे सत्तारूढ काँग्रेसचे धोरण याविरुद्ध होता.

केंद्रीय नोकरांना पगारवाढ देण्याचे त्यांनी आश्वासन दिलेच. पण बेकारांनाही भत्ता मिळेल म्हणून जाहिर केले.

बोलता बोलता लहान मोटारी बनविण्याचा विषय निघाला, तेव्हा ते म्हणाले, ' संजीव गांधीसारखे शेकडो तरुण देशात आहेत. पण त्यांना असा परवाना मिळत नाही. कारण माहित आहे ? त्यांच्या आया पंतप्रधान नाहीत ना, म्हणून. '

लाल बहादूर शास्त्रीच्या मृत्युचे भांडवल अजूनही करता येते. त्या मृत्युच्या गूढासंबंधी चौकशी करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

एकंदरीत या दोन नेत्यांच्या सभांचे तात्पर्य काय ?

काही सांगता येत नाही, कारण दोन्ही सभांना सारखीच गर्दी होती. सारख्याच टाळ्या होत्या, सारख्याच घोषणा होत्या. त्यावरून ताकद जोखणे धाष्टर्याचे.

याबाबत आपल्याला केंद्रीय नोकरांचे पटले. इंदिरा बाईंनी लंच अवरमध्ये बोट क्लबवर सभा घेतली तिला, किंवा रामकृष्ण पुरममध्ये वाजपेयींनी घेतली तिला, उपस्थिती भरपूर होती. पण प्रतिसाद दोन्ही नेत्यांना यथातथाच मिळाला. हुर्या नाही, टाळ्या नाही, घोषणा नाहीत.

कोणी सांगावे, उद्या कोण निवडून येतो ? कोणीही आले तरी पोटासाठी राबायचे आहे.

या दिवसात प्रत्येक गोष्टीला राजकारणाचा कसा वास येतो याचे एक उदाहरण. रविवारी दिल्लीतील रस्त्यावरून अनेक मुलं–मुली, तरुण–तरुणी आणि म्हातारे (एकूण आकडा ३६० च्या आसपास) गटागटाने एकाच दिशेने जात होते. प्रत्येकाच्या पाठीवर ' बोलणे कमी, काम जास्त ', ' आपले शहर स्वच्छ ठवा ', ' स्वावलंबन हीच खरी शक्ती ' किंवा अगदी ' हम दो, हमारे दो ' अशा घोषणा असलेले फलक होते. प्रत्येकाच्या छातीवर भगव्या रंगाचे बिल्ले अडकवले होते.

भगवा रंग नं ? मग जनसंघच नक्की ! अशी धारणा होत होती. पण जवळ जाऊन बिल्ला पाहिला की सर्व्हिस सिव्हिल इंटर नॅशनल इंडिया अशी अक्षरं दिसायची. जनसंघाचा त्याचा काहीही संबंध नव्हता.

या पदयात्रेमागची कल्पना मोठी छान होती. कुणालाही त्यात भाग घेता येईल.

फक्त प्रत्येकाने किमान एक रुपया इतरांकडून मिळवून द्यायचा. तो कशासाठी! तर तेवीस किलोमीटरवरच्या नानग्लोई झोपडपट्टीत एक दवाखाना सुरू करायचा आहे, त्यासाठी हा निधी.

या सर्व्हिस सिव्हिलने ही झोपडपट्टी दत्तक घेतली आहे. मागे अशीच पदयात्रा निघाली, तेव्हा दहा हजार रुपये जमा झाले होते. यावेळी सहा हजार.

भारत, हॉलंड, बेल्जम, फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन, अमेरिका व स्वीत्झर्लंडच्या लोकांनी यात भाग घेतला होता.

काही 'चेक पॉईंटस्'वर प्रत्येकानी रिपोर्ट करायचा आणि रस्त्यात लोकांना आपले उद्दिष्ट समजावून निधी गोळा करायचा असा कार्यक्रम. थकवा आला, नकोसं वाटलं तर परतायचं. पण नानग्लोईपर्यंत जवळजवळ सगळे आले, शेवटी तर आधी कोण पोचतो याशाठी शर्यत लागली. लालबुंद झालेले मुखडे 'हरे कृष्ण, हरे कृष्ण' म्हणत धापा टाकतच आले.

—तर अशा तऱ्हेने ही एक खूप छान योजना. राजकारण कुछ नही, आता लोकांना काय वाटावे, हे कोण सांगणार?

या सर्व्हिसने दिल्लीतच शहाद्राची कुष्ठरोग वसाहतही दत्तक घेतली आहे. बिहारच्या दुष्काळग्रस्तांसाठी विहिरी खणता याव्या म्हणूनही निधी गोळा करण्याचा प्रयत्न चालू आहे.

दोन्ही संदर्भात माणूस प्रतिष्ठानची सुपे मोहिम आणि बाबा आमट्यांची चांदाची वसाहत आठवली.

—

थोडे विषयांतर: इंदिरा गांधी आणि वाजपेयी एकमेकांना वेगवेगळ्या संदर्भात कुमशहा हिटलर म्हणतात. शिवाय आपले शिवसेना सेनापती बाळासाहेब ठाकरे आहेतच.

त्यावरून आठवलं, हॉलिवुडची मदनिका मेरिलिन मन्रोने आत्महत्या केली. त्यानतर, मला वाटतं, मार्मिकमध्येच एक विनोद आला होता. महाराष्ट्राची मेरिलिन मन्रो अशी आपल्या एका नटीची ओळख खुद्द प्रत्यक्ष मन्रोशी करून दिली आणि आपली ही 'प्रती' बघताच धक्क्याने तिने जीव दिला, असा तो विनोद होता.

त्या अर्थाने भारतातील हे आरोप प्रत्यारोप ऐकून बिचाऱ्या हिटलरच्या आत्म्याला अगदी मेल्याहून मेल्यासारखे होत असेल, नाही?

□ □ □

# सातपैकी सहा नवकाँग्रेस

मराठवाडा हा महाराष्ट्रातील सत्तारूढ काँग्रेसचा एक बळकट गढ समजला पाहिजे. सर्व महाराष्ट्रातच सत्तारूढ काँग्रेस भारतातील इतर प्रांताच्या मानाने अधिक बलवान आहे. त्यापैकी मराठवाडा हा सत्ताधारी पक्षाचा विशेष बलवान विभाग मानला पाहिजे. मराठवाड्यातही अधून मधून विधान सभेच्या क्वचित काही जागा व एखादी लोकसभेची जागा विरोधी पक्षाला मिळते. पण त्याची कारणे पक्ष संघटनेत किंवा काँग्रेसच्या दुबळेपणात शोधण्यापेक्षा अंतर्गत गटबाजी किंवा उमेदवारांच्या जाती, अशी शोधावी लागतात. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळेला लोकसभेची फक्त एकच जागा विरोधी पक्षाला मिळाली होती. ही जागा म्हणजे बीडची नाना पाटलांची जागा होय. नाना पाटील निवडून का आले याची कारणे स्पष्ट आहेत. एकतर मोठ्या प्रमाणात शेतकरी कामकरी पक्ष आणि कम्युनिस्ट पार्टी यांच्यामधून काँग्रेस प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी विधान सभेचे मत काँग्रेसला व लोकसभेचे मत नाना पाटलांना अशी भूमिका घेतली. दुसरे म्हणजे, विरोधी उमेदवाराची जातही आडवी आली. (काँग्रेस पक्षाने उभा केलेला उमेदवार जातीने मारवाडी होता.) असा एखादा अंतर्गत घातपाताचा प्रकार विरोधी पक्षाच्या विजयात रूपांतरीत होताना दिसतो. तेवढा सोडला तर काँग्रेस पक्ष मराठवाड्यात निवडणूक प्रांतापुरता अतिशय बलवान पक्ष आहे, हे सर्वांनाच कबूल आहे. निवडणुकीच्या तोंडावर सांगावयाचे, कबूल करावयाचे नसते इतकाच फरक आहे.

मराठवाड्यात लोकसभेच्या एकूण सात जागा आहेत. यापैकी लातूर मतदार संघ हा राखीव मतदार संघ आहे. गेल्यावेळी या मतदारसंघातून काँग्रेस उमेदवाराला १.२५ लक्ष मते पडली होती आणि रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवाराला ८७ हजार मते पडली होती. यावेळी या मतदारसंघात रिपब्लिकन पक्ष निवडणूक लढवित नाही. काँग्रेसचे उमेदवार तुळशीराम कांबळे यांच्याविषयी सर्वसाधारण लोकमत प्रतिकुल आहे. सं सो. पा. चे ग्रामीण भागात काम असणारे लातूर, देगलूर, उदगीर, आदि विभाग या मतदारसंघात आहेत. सं. सो. पा. ही जागा लढवित आहे. त्यांचे उमेदवार ॲडव्होकेट शृंगारे यांना मोठ्या प्रमाणात या विभागात पाठिंबाही दिसत आहे. सध्या चालू असणारी अंतर्गत बोलणी जर सफल झाली आणि खोब्रागडे गट रिपब्लिकन पक्षाने जर पाठिंबा सं. सो. पा. च्या उमेदवारास व्यक्त केला तर अल्प बहुमताने ही जागा सं. सो. पा. जिंकू शकेल. खोब्रागडे गटाचा जर पाठिंबा इथे मिळू शकला नाही तर सर्वांच्या राजी नाराजी अस-

ण्याला गुंडाळून ठेवून नित्याप्रमाणे प्रचंड बहुमताने सत्तारूढ कॉंग्रेस पक्ष ही जागा जिकील. तेव्हा या जागेचा निर्णय स्पष्टच सांगावयाचे तर भय्यासाहेब आंबेडकर यांच्यावर अवलंबून आहे.

औरंगाबाद जिल्ह्याला दोन जागा आलेल्या आहेत. पैकी एका जागेवर माणिक-राव पालोदकर उभे आहेत. त्यांच्याविरुद्ध पाच उमेदवार उभे आहेत. यापैकी दोघेजण मुसलमान आहेत. एक उमेदवार खोब्रागडे गटाचा आहे. विरोधी पक्षाची मते अशा प्रकारे विभागली जाणार आहेत. या ठिकाणी जनसंघाच्या वतीने श्री. रामभाऊ गांवडे निवडणूक लढवीत आहेत. गांवडे हे या भागातील वजनदार कार्यकर्ते असून त्यांना मोठ्या प्रमाणात कॉंग्रेसमधील नाराज देशमुख गटाचा पाठिंबा आहे. संपूर्ण मराठवाड्यात ज्या ठिकाणी जनसंघाला पन्नास हजारांहून अधिक मते मिळतील अशी ही एकच जागा आहे. ही मते विजयासाठी पुरेशी नाहीत हेहि उघड आहे. या मतदार संघात कॉंग्रेस उमेदवाराचे भवितव्य निश्चित आहे. माणिक-राव पालोदकर तीस हजारांपेक्षा अधिक मतांनी विजयी होतील असा जाणकारांचा अंदाज आहे. याच जिल्ह्यातील लोकसभेची दुसरी जागा जालना मतदार संघा-तील आहे. येथे सं. सो. पा. च्या वतीने बापूसाहेब सोळुंके उभे आहेत. या मतदार-संघात परभणी जिल्ह्यातील स. सो. पा. चे काम असणारा पुष्कळ भाग आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील या मतदारसंघात सं. सो. पा.चे काम पुष्कळ आहे. येथे त्यांना शे. का. पक्षाचा पाठिंबाही मिळालेला आहे. तेव्हा साळुंके यांची बाजू बरोच बळकट आहे असे म्हणावयाला हरकत नाही. कॉंग्रेसमधील नाराज गटही विशेषत: माजी मंत्री श्री. भगवंतराव गाढे यांचाही कॉंग्रेस मतदानावर प्रतिकुल परिणाम होईल. शेख महंमद सालार हे अपक्ष मुस्लिम उमेदवार या भागातून निवडणूक लढवित असल्यामुळे व ते स्वत: अतिशय खटपटी उमेदवार असल्यामुळे मुसल-मानांचीही हुकमी मते कॉंग्रेसला मिळणार नाहीत. या सर्व वजेच्या बाबी गृहीत धरल्या तर कॉंग्रेस पक्षाच्या वतीने जमेची एकच बाजू आहे–पण ती जमेची बाजू एवढी प्रभावी आहे की सारी बजाबाकी होऊन गेल्यानंतर शिल्लक कॉंग्रेसच्या बाजूने राहते. ही जमेची बाजू म्हणजे येथून निवडणूक लढवित असलेले कॉंग्रेस उमेदवार स्वत: श्री. बाबूराव काळे हे होते. बाबूराव काळे हे या भागातील अतिशय वजनदार, निवडणूक यंत्रणा हाताळण्यात चतुर असलेले बडे प्रस्थ आहे. ही जागा विरोधी पक्षाला मिळण्याचा संभव आहे. मात्र हा संभव फार जपून घ्यावयाला पाहिजे कारण या विभागात कम्युनिस्ट, कॉंग्रेस उमेदवाराला पाठिंबा देण्याचा संभव आहे. तसे जर झाले तर पुन्हा बाबराव काळेच प्रचंड मताने निवडून येतील.

यानंतर बीड जिल्ह्याचा क्रमांक येतो. गेल्या खेपेस ही एकच जागा, विरोधी पक्षांनी म्हणजे कम्युनिस्टांनी सुमारे चौदा हजार अधिक मतांनी जिंकली होती. त्यामुळे या जागेवर विरोधी पक्षाचा खास हक्क मानला जातो. या मतदार संघातून

पृष्ठ ५४ वर

# कम्युनिस्ट - दमानिशेठ सोयरिकीचा सोलापूर जनतेने केलेला तीव्र धिक्कार

# रंगा वैद्य आघाडीवर

माणूस प्रतिनिधी शरद कृष्णन् यांजकडून

आगामी लोकसभा निवडणुकीतील सरळ सामन्यांचे प्रमाण हाताच्या बोटावर मोजण्याइतके अल्प आहे. महाराष्ट्रात तर हा योग फक्त सोलापूरला आणि तोही मोठ्या मुष्किलीने जुळवून आणला गेलेला आहे. स्वाभाविकपणे सोलापूरच्या लढतीला विशेष महत्व प्राप्त झालेले आहे.

नवकाँग्रेस तर्फे उद्योगपती श्री. सुरजरतन दमानी उभे असून त्यांच्या विरोधात 'सोलापूर संचार"चे संपादक श्री. रंगा वैद्य उभे आहेत. दोन्ही बाजूच्या प्रचाराला जोरदार सुरुवात झाली आहे. प्रत्यक्ष भेटीगाठीनंतर या मतदार संघाचे वस्तुनिष्ठ चित्र उभे राहते ते असे.

सोलापूर शहर आणि जिल्हा यामधील सर्वात बलवान पक्ष म्हणून सत्ताधारी काँग्रेस पक्षाचाच उल्लेख करावा लागेल. प्रदेश काँग्रेसच्या नेतृत्वाने जिल्हयामधील व शहरातील काँग्रेसचे बळ तर कायम राहील, पण प्रदेश काँग्रेसवर दबाब आणण्याइतकी ताकद स्थानिक नेतृत्वात उभी राहणार नाही अशी प्रथमपासूनची दक्षता घेतली. छत्रसिंग चंदेल, नामदेवराव जगताप, शंकरराव मोहिते पाटील (अकलूज) तुळशीदास जाधव, अप्पासाहेब काडादी, ब्रह्मदेव माने, निर्मलाराजे भोसले, आदि मंडळींचा गरजेप्रमाणे उपयोग करून घेतला. ज्यांची गरज आहे त्यांच्या पाठीवर अजूनही प्रदेश काँग्रेसचा 'यशवंत हस्त' प्रेमाने फिरतो आहे. प्रदेश काँग्रेसच्या या विशिष्ट धोरणामुळे शहर आणि जिल्हा काँग्रेस कायम प्रदेश काँग्रेसकडे डोळे लावून बसलेली दिसते. चालू निवडणुकीच्या संदर्भातील उदाहरणच देतो. उमेद-

वारांसंबंधी ज्या वेळेस प्रदेश काँग्रेसकडून विचारणा करण्यात आली, त्या वेळेस सोलापूर शहर व जिल्हा काँग्रेसने साळी समाजातील एक कार्यकर्ते गंगाधर कुचन यांना सोलापूर शहर मतदार संघातून उभे करावे अशी एकमुखी मागणी केली. आणि त्याला पुस्ती जोडली, की या संदर्भातले अंतिम अधिकार प्रदेश काँग्रेसकडे म्हणजेच पर्यायाने 'साहेबांकडे' राहतील आणि त्यांनी सुचविलेला उमेदवार आम्ही निवडून आणू.

उमेदवार निवडीचे राजकारण मुंबईत सुरू झाले. गंगाधर कुचन यांना तिकीट मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु वातावरण त्यांना अनकुल नाही म्हटल्यावर, निदान बाहेरचा उमेदवारतरी (६७ साली हुतात्मा घराण्यातील शिवशंकर मल्लाप्पा धनशेट्टी यांच्या विरुद्ध १७-१८ हजार मतांनी निवडून आलेले सुरज-रतन दमानी) पुन्हा नको असा सूर स्थानिक नेतृत्वाने काढला. परंतु प्रदेश काँग्रेसने विरोधाला न जुमानता समाजवादी काँग्रेसला सढळ हाताने मदत करणाऱ्या दमानी शेटजींची उमेदवारी शहरासाठी निश्चित केली. नव-काँग्रेसचा उमेदवार ठरत असतानाच विरोधी पक्षांनी चाचपणीस सुरुवात केली. शेठजीला शेठजी म्हणून स्वतंत्र पक्षातर्फे लालचंद हिराचंद यांचे नाव पुढे आले. सोलापूरशी संबंध असल्याने लालचंद शेठजींच्या उमेदवारीबद्दल सोलापूरात सहानुभूती होती. तथापि त्यांच्या स्वतःच्या निर्णयाप्रमाणे काही 'तांत्रिक अडचणी आणि व्यक्तिगत कारणां-मुळे' त्यांनी माघार घेतली.

दमानी शेठजींचे नाव निश्चित होऊन त्यांनी अर्ज भरल्यावर संघटना काँग्रेस तर्फे डॉ. अंत्रोळीकर, हिंदूसभेचे वि. रा. पाटील, ६७ साली दमानींबरोबर लढलेले धनशेट्टी यांनी उमेदवारी भरली. वि. रा पाटील यांनी तर कोणत्याही परिस्थितीत आपण हटणार नाही अशी भूमिका घेतली. विरोधी पक्षांच्या या पक्षीय रेटारेटी-विरुद्ध गावात असंतोषाची भावना उद्‌भवली. श्री. रंगा वैद्य यांनी संचार मधून विरोधकांनी एकच उमेदवार उभा केला, तर काही घडगत आहे असे आवाहन सुरू केले. विरोधी पक्षांनाही हा विचार पटू लागला. परंतू मागे हटण्यास कोणी तयार होईना. अशा परिस्थितीमध्ये १९६७ साली तिकीट प्रकरणावरून 'बंडखोरी करून काँग्रेस मधून बाहेर पडलेले आणि उत्तर सोलापूर मतदार संघातून विधान-सभेवर अपक्ष म्हणून निवडून गेलेले ब्रह्मदेव माने यांनी पुढाकार घेतला. बैठका सुरू झाल्या. पक्षीय अभिनिवेश सोडून कोणीच हटायला तयार नाही असे पाहिल्या-वर रंगा वैद्य यांचे नाव अचानकपणे पुढे आले. या संदर्भात ब्रह्मदेव माने यांना सर्वाधिकार देण्यात आले. के. बी. अंत्रोळीकर (संघटना काँग्रेस) बाबा कुसरकर (पी. एस्. पी.) आदम मास्तर (डावे कम्यु.) पन्नालाल सुराणा (सं. सो. पा.) गचेटी वकील (जनसंघ) यांनी वैद्य यांच्या उमेदवारीस मान्यता दिली. दोन फेब्रुवारी रोजी रंगा वैद्य यांनी जाहीर सभा घेऊन जनतेचे मत अजमाऊन पाहिले.

लढत सरळ व्हावी म्हणून अखेरीस शिवशंकर धनशेट्टी बाजूला झाले. वि. रा पाटील मैदानात राहून लढत तिरंगी होणार असे वाटत असतानाच पाटील यांनीही आपली उमेदवारी मागे घेतली. आणि वैद्य–दमानि सरळ लढतीची निश्चिती झाली.

## उपेक्षेची भावना-स्वत्त्वाला आव्हान

लढत सरळ व्हावी म्हणून जे प्रयत्न झाले, त्याकडे सोलापूरची जनता अतिशय सहानभुतीनें पहात होती. ही लढत सरळच झाली पाहिजे, अशी जनतेची मागणी होती, तिचे दडपणही नेत्यांवर पडले: सोलापूर शहर आणि जिल्हा म्हणजे काँग्रेसच्या हातातले बाहुले, त्यांनी मनात येईल तसा खेळ करावा, योग्य ठिकाणी प्रतिनिधीत्व नाकार वे, शहराचे–जिल्ह्याचे प्रश्न कोरडी सहानुभूती दाखवून निकाली काढावेत, याबद्दल जनतेमध्ये असंतोष होता. सोलापूर शहर आणि जिल्ह्याची हेळसांड केल्याची कितीतरी उदाहरणे नागरिकांकडून ऐकावयास मिळाली.

अनेक वर्षे मागणी केल्यावर सोलापूरला सरकारी पॉलिटेक्निक सुरू करण्यात आले. एक वर्षभर ते चालविले. दुसऱ्या वर्षी सर्व बाडबिस्तान्यासह हे महत्त्वाचे तांत्रिक महाविद्यालय साहेबांच्या कऱ्हाडला नेण्यात आले. ज्यांनी एक वर्ष अभ्यासक्रम पूर्ण केला होता, अशा विद्यार्थ्यांची फार पंचाइत झाली. सुरू केलेले कॉलेज, एक वर्षाभरात उचलून नेण्याचे हे उदाहरण 'युनिक' म्हणावे लागेल.

सोलापूर शहराला चांगला पाणीपुरवठा व्हावा, अशी नागरिकांची अनेक वर्षांची मागणी होती. नागरिकांनी भीमा पाणीपुरवठा योजनेसाठी १ कोटी रुपये जमा करून शासनाकडे भरले. ही रक्कम भरल्यावर आणि कार्पोरेशनने आपला वाटा उचलल्यावर तब्बल ५ वर्षांनी सोलापूरकरांची ही २० वर्षांची मागणी गेल्या वर्षी पूर्ण करण्यात आली. योजनाकालामध्ये पडलेल्या दीर्घ कालखंडामुळे ही १ कोटीची योजना ३ कोटींवर गेली.

रेल्वे सुखसोयींबाबत सोलापूरकरांच्या अनेक तक्रारी केवळ दप्तरी पडून आहेत. सोलापूर, औरंगाबाद लिंक द्या, पंढरपूर-कुर्डुवाडी मार्ग ब्रॉडगेज करा, यासाठी वर्षानुवर्षे मागणी करण्यात येत आहे. परंतु योग्य प्रतिनिधित्वाअभावी लोकसभेमध्ये साधा आवाजही उठू शकत नाही. टेलिफोन सर्व्हिस सोईस्कर नसल्याने अॅटोमॅटीक सर्व्हिस सुरू करा, अशी मागणी मूळ धरून आहे. पण दिल्लीत कोणी दाद घेत नाही.

जुन्या गिरणी प्रकरणी, शासनाने जी सोलापूरकरांची क्रूर चेष्टा केली त्याला तर तोड सापडणार नाही: सोलापूरमधील सर्वांत मोठी गिरणी १९६० साली अत्यंत गैरव्यवस्थापनामुळे बंद पडली. शासनाने काही दिवस ही गिरणी चालविली परंतु गिरणीचे अखेरचे मालक गोकुळदास मोरारका यांनी सुप्रीम कोर्टापर्यंत जाऊन २ कोटींची नुकसानभरपाई मिळवून गिरणी परत घेतली. दोन वर्षात गिरणीचे बारा वाजले. या संदर्भात दौलतजादा कमिशनने म्हटले आहे : एकाच जागेवर चार-चार माणसे काम करीत आणि चौघांनाही पगार मिळे. ज्या केर•

सुणीची किंमत सोलापूरला एक दिडकी होती, अशा केरसुण्या सहा आणे किंमत देऊन खरेदी करण्यात आल्या. इत्यादी. गैरव्यवस्थापनामुळे गिरणी बंद पडली. सुमारे १४ हजार कामगार बेकार झाले. घरटी चार माणसे धरली तरी ५६ हजार लोक अन्नाला मोताद झाले. अनेक कामगारांनी आत्महत्या केल्या. ज्यांनी गिरणीत तीन-तीनशे रुपये पगार घेतले अशी मंडळी ५०–७५ रुपयांवर मिळेल ते काम करू लागली आणि या सर्व प्रकरणी शासनाने काय केले ? अत्यंत क्रूर चेष्टा. अगदी थेट यशवंतरावांपासून सर्वांनी गिरणी सुरू होणार अशी आश्वासने दिली पण गिरणीचे सर्व सामान स्क्रॅप म्हणून विकले गेले. आता जागेवर केवळ गोडाऊन आहे. गिरणीच्या चाळीमध्ये जे कामगार गेली अनेक वर्षे रहात आहेत, त्यांनाही हाकलून काढायची मोहीम सध्या जोरात आहे. जुनी गिरणी प्रकरण आता इतिहासजमा झाल्यासारखे असले तरी अगदी आत्ता-आत्तापर्यंत गिरणी सुरू होणार, आठ दिवसात मुहूर्त, अशा बातम्या येत होत्या. एक सोलापूरकर तर विनोदाने म्हणाला, या वृत्तपत्रवाल्यांना म्हणावे, नेताजी सुभाषचंद्र जिवंत आहेत आणि जुनी गिरणी सुरू होणार, या बातम्यांचे आता ब्लॉक्सच करून ठेवा आणि ते अधूनमधून वापरत चला.

असं हे गिरणी प्रकरण. दहा वर्षे झाली असली तरी या सर्व प्रकरणात शासनाने जी थापेबाजी केली, त्यामुळे जखम अजून ओली आहे. गिरणी सुरू करण्याबाबत वेळोवेळी ज्या अनेक थापा मारल्या गेल्या त्यामुळे चिडून, दोन वेळा विधानसभेवर गेलेल्या राजाराम ढवळे यांना सोलापूरकरांनी ६७ मध्ये घरी बसवले. आता चालू निवडणुकीत ते दमानि यांचे निवडणूक सहाय्यक आहेत.

या सर्व प्रकरणांमुळे सोलापूर निवडणूक सरळ व्हावी, अशी मतदारांची खरोखर इच्छा आहे. आणि अपेक्षेप्रमाणे तसे घडून आल्याने शहरात तरी वातावरण जोरात आहे. काँग्रेसला धडा शिकविण्याच्या गोष्टी मंडळी बोलत आहेत.

■ ■ ■ ■ ■ ■

## पार्श्वभूमी

■ ■ ■ ■ ■ ■

सोलापूर मतदार संघाची राजकीय पार्श्वभूमी अशी आहे :

१॥–२ वर्षांपूर्वी म्हणजेच ६७ च्या निवडणुकांनंतर सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या. काँग्रेसचे उमेदवार प्रचंड संख्येने महापालिकेत दाखल झाले. सध्या ५५ सदस्य असलेल्या या महापालिकेमध्ये काँग्रेसचे ४४ सभासद असून इतर सर्व पक्षांनी, पक्षाची कात टाकून तयार केलेल्या नागरी आघाडीचे ११ सदस्य

पृष्ठ ३४ वर

# कुलाबा

## तिरंगी लढत
## ए. टी. मतं फोडणार
## लाभ नवकाँग्रेसला

माणस प्रतिनिधी सु. ल. सोमण यांजकडून

महाडला मुख्यमंत्री वसंतराव नाईकांची सभा होती. कुलाबा जिल्ह्यातल्या ह्या तालुक्यात काँग्रेसचं वर्चस्व. इथनंच नवकाँग्रेस उमेदवार, आ. शं. बा. सावंत मोठी आघाडी मिळवतील असं, कुलाबा जिल्ह्यात हिंडत असताना अनेकानी मला सांगितलं पण सभेचं वृत्त कळताच महाडला गेल्यावर मला आढळलं ते शे. का. पक्षीय लाल बावटयाचं अस्तित्व ! ठिकठिकाणी, अगदी जिथनं मुख्यमंत्री महाडात प्रवेश करणार होते त्या ठिकाणच्या कमानी नजिकही लाल बावटे फडकत होते. ठिकठिकाणी शे. का. पक्षीय आमदार दत्ता पाटील ह्यांचे प्रचार-फलक झळकत होते. अनेक भिती घोषणांनी रंगल्या होत्या. लाल बावटयांच्या तोडीनंच, ठिकठिकाणी भगवा फडफडत होता. शिवसेनेच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे, घोषवाक्यं होती, प्रचार फलक होते. फक्त कुठे प्रचार फलक सौ. सुहासबाई भिसे ह्यांच्या नावानी होते तर कुठे 'पुरस्कृत'(?) ए. टी. पाटील ह्यांच्या नावानी होते. लाल-भगव्यांच्या मध्ये कुठेतरी क्वचित तिरंगी काँग्रेसी ध्वज होते. पण नवकाँग्रेस उमेदवार आ. शं. बा. सावंत ह्यांच्या नावचे फलक मला अभावानेच दिसले. दिसले ते सारे इंदिरा गांधींचं आवाहन दर्शविणारे, कै. नेहरूंचा हात जोडून फोटो

असलेले फलकच दिसले. मुंबईतही नवकाँग्रेसबाबत हीच गोष्ट विशेषत्वानं लक्षात येत होती. साऱ्या ठिकाणी, उमेदवार त्याचं व्यक्तिगत कर्तृत्व, नवकाँग्रेसचा कार्यक्रम इत्यादीवर भर दिला गेलेलाच नाही. भर दिला गेला आहे तो इंदिराजींच्या आवाहनावर; भर दिला गेला आहे तो इंदिराजींचे हात बळकट करण्याच्या आवश्यकतेवर. इंदिराजी म्हणजे नवकाँग्रेस व नवकाँग्रेस म्हणजे इंदिराजीच फक्त हे समीकरण, नवकाँग्रेसच्या ताज्या प्रचार पत्रकांवरून, प्रचार फलकांवर फार फार प्रकर्षानं जाणवतं. महाडमध्येही ह्याचाच प्रत्यंतर आलं. मुख्यमंत्र्यांच्या प्रचार सभेतही वरील गोष्टीचंच प्रत्यंतर यावं अशीच व्याख्यानं झाली. समाजवादाची तबकडी अर्थातच नेहमीप्रमाणे लावली गेली. इंदिराजींचा 'समाजवाद' विरुद्ध प्रतिगामी शक्तींचा 'जैसे थे' वाद ह्यातला हा झगडा असल्याचं तुणतुणं वाजवलं गेलं. पण गंमत ही की कोंकणातला सामान्य माणूस आज ज्या गोष्टींची आतुरतेनं वाट पाहात आहे, त्या 'कोकण रेल्वे' 'कोकणाची औद्योगिक वाढ,' 'जुळी मुंबई आणि कोकण' 'कोकणातला वहातुकीचा व पाणीपुरवठ्याचा प्रश्न' वगैरे अनेक प्रश्नांवर मात्र कटाक्षानंच जवळजवळ मौन पाळलं गेलं. ह्याचा खुलासा करण्याचा काही प्रयत्न उरण येथे नंतर भरलेल्या तालुका काँग्रेस (सत्ता.) कार्यकर्त्यांच्या शिबीराचे वेळी झाला. त्यात व्यक्त झालेल्या, नेत्यांच्या मतांनुसार हे प्रश्न स्थानिक स्वरूपाचे आहेत. तूर्त 'प्रतिगामी शक्तिविरुद्धची लढाई' ह्याच दृष्टीनं सध्याच्या स्ट्रॅटेजीज निश्चित करावयाच्या आहेत.' ह्या स्थानिक प्रश्नांसाठी बहात्तर मध्ये विधानसभा निवडणूकांनी पुन्हा आम्हाला जनतेसमोर यायचंच आहे.'

महाडची मुख्यमंत्र्यांची प्रचार सभा तशी यशस्वी झाली असं मानायला हरकत नाही. गावभर लागलेले लाल-भगवे ध्वज, सभेच्या दिवशी सकाळीच शे. का. प.च्या महाड तालुक्यातल्या वाढत्या प्राबल्याचं मला ऐकू आलेलं वर्णन—ह्या पार्श्वभूमिवर पाच-सहा हजारांचा तो जनसमुदाय, निश्चितच खूपच मोठा होता. (काँग्रेस कार्यकर्ते हाच आंकडा फुगवून फुगवून चौदा हजारांवर नेतात; तर वृत्तपत्रे २॥–३ पासून ७–८ हजारांचा अंदाज व्यक्तवतात. माझ्या मते अंदाज सहा हजार!) सभेत, मी वर म्हटल्याप्रमाणेच काही खास ऐकायला मिळालं नाही. घासून घासून गुळगुळीत झालेल्या समाजवादाच्या तबकड्यांवरून जनतेचं दारिद्र्य मोडून काढायच्या, धनाढ्यांचं आर्थिक साम्राज्य मोडून काढायच्या घोषणा ऐकायला मिळाल्या. 'देशाला स्थिर शासन मिळावं, देशांतल्या सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी दूर व्हावी ह्यासाठी नवकाँग्रेसकडेच फक्त कार्यक्रम आहे. म्हणून नवकाँग्रेसलाच निवडून द्या...महाराष्ट्रातनं एकही जागा कुठल्याही विरोधकांना मिळणार नाही...' इत्यादि इत्यादि.

मा. वसंतरावांची ही सभा झालेली असली आणि २८ ता. ला श्री. यशवंतराव

चव्हाणांची सभा जाहीर झालेली असली तरी, लोकसभेच्या ह्या मतदारसंघात अद्याप म्हणावी तशी धार निवडणुक प्रचाराला आलेली नाही. विसर्जित लोकसभेतले ह्या भागातले खासदार श्री. नानासाहेब कुंटे हे 'भाक्रंद' तर्फे बड्या आघाडीचे उमेदवार म्हणून पुन्हा निवडणुक लढवीत आहेत. तर त्यांच्या विरुद्ध नवकाँग्रेसचे आमदार श्री. शं. बा. सावंत शे. का. पक्षाचे आमदार श्री. दत्ता पाटील व अपक्ष उमेदवार व भूतपूर्व आमदार श्री. ए. टी. पाटील हे निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत. श्री. नानासाहेब कुंटयांना संघटना काँग्रेस, जनसंघ मदत करीत आहेत; श्री. दत्ता पाटलांना कम्युनिस्टांनी मदत द्यायचं ठरवलं आहे, तर अपक्ष श्री. ए. टी. पाटील ह्यांना शिवसेना, रिपब्लिकन पक्ष (बी. सी. कांबळे गट) इत्यादींनी पाठिंबा जाहीर केला आहे. ह्या जिल्ह्यात नवकाँग्रेस व शेतकरी कामगार पक्ष हेच खरे संघटित सामर्थ्य असलेले पक्ष आहेत. शिवसेनेचा जोर वाढता आहे; परंतु निवडणुकीवर काही निर्णायक बदल लादण्या इतपत तो मोठा आहे असे निदान मला तरी वाटलं नाही. संघटना काँग्रेस व भाक्रांद नगण्य आहेत. श्री. नानासाहेबांच्याच एका प्रचारकानं सांगितल्याप्रमाणे, 'जिल्ह्यात संघटना काँग्रेसला काहीही संघटना नाही, आणि 'भाक्रांद'चे खुद्द नानांसह तीन नेत्यांशिवाय अन्य कुणीही समर्थक नाहीत. प्रचाराची सर्व सूत्रं म्हणूनच संघ कार्यकर्त्यांकडे गेलेली तुम्हाला आढळतील.' संघाजवळ धडपड्या, निष्ठावंत कार्यकर्त्यांचा संच जरूर आहे; परंतु दुर्दैवानं त्यापलिकडे मतदार आकर्षून घेण्याची ताकद त्यांच्याजवळ नाही. गेल्या लोकसभेच्या निवडणुकात जनसंघाच्या श्री. खोकांना साडेतीन लाखांपैकी अठरा हजार मतं मिळाली होती. ही तीस हजारांपर्यंत वाढली असावीत असं नानासाहेबांच्या एका समर्थकानं सांगितलं. मला मात्र हा अंदाज अवास्तव वाटतो. नानासाहेबांच्या उमेदवारीनं काही स्वयंसेवक नाराज आहेत. निदान उदास तरी निश्चित आहेत ! तर, काही शिवसैनिकही, भिसेबाईंनी उमेदवारी मागे घेतल्याने प्रचाराबाबत उदास असल्याचं मला जाणवलं. त्यांतल्या काहींनी मला सांगितलं की, 'शिवसेनेचा उमेदवार मागे घ्यायचा तर बाळासाहेबांनी जनसंघ विरोधी भूमिका घ्यायला नको होती. भिसेबाईंनी माघार घेतली नसती तर अनेक संघ कार्यकर्तेही बाईंसाठी राबले असते.' कम्युनिस्ट देखील इथे नावाला आहेत. प्रसोपा, संसोपा आदि गटांची, दखल घ्यावी अशी इथे मुळीच परिस्थिती नाही.

ह्या पार्श्वभूमिवर शे. का. पक्षाचंच खरंखुरं संघटित सामर्थ्य ह्या जिल्ह्यात उभं आहे. त्यांच्यात अजिबात फाटाफूट नाही किंवा असंतोष नाही असं मात्र नाही. सुरुवातीला शे. का. प. ने आ. धुळूप ह्यांची उमेदवारी जाहीर केली होती. परंतु नंतर अनपेक्षितपणे निर्णय फिरवला गेला. आ. धुळूप ठाणा-जिल्हा मतदार संघात गेले आणि कुलाब्यासाठी आ. दत्ता पाटलांचं नाव पुढे आलं. ह्या संबंधात

मला सांगितलं गेलं की, आ. दत्ता पाटलांचं नाव कुणाच्या ध्यानीमनीही नव्हतं. आ. डी. बी. पाटील (पनवेल) किंवा आमदार सामंत किंवा कुलाबा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वाजेकर ह्यांचीच नावं ह्या जागेसाठी सुचवली गेली होती. ऐनवेळी कशी कळ फिरली कोण जाणे, पण अचानक श्री. दत्ता पाटलांचं नाव पुढे येऊन त्यांची उमेदवारी घोषित केली गेली. ह्यामुळे अनेक कार्यकर्ते नाराज असल्याचं दिसलं. प्रत्यक्षात आ. दत्ता पाटलांनीही, त्यांची उमेदवारी त्यांना अनपेक्षित होती असंच मला सांगितलं. आ. धुळूप ठाण्यास गेल्याने व डी. बी. पाटील, वाजेकर ऐवजी दत्ता पाटलांची निवड झाल्याने सुरुवातीला नाराज झालेले एक कार्यकर्तेही तिथे उपस्थित होते. 'असं असलं, तरी हे सर्व कार्यकर्ते आता माझ्यासाठी रात्रंदिवस फिरत आहेत; कष्ट उचलत आहे. मतभेद कुठेही नाहीत; नि माझं यश नक्की आहे.' असही आ. दत्ता पाटलांनी पुढे सांगितलं.

ह्या खेरीज शे. का. पक्षाला दुसरा धक्का, १५–२० दिवसांपूर्वीच आ. शेटे ह्यांनी दिला. ह्या अंध आमदारांनी, आमदारकीचा राजिनामा देऊन, नवकाँग्रेसमध्ये समारंभपूर्वक प्रवेश केला. पेण तालुक्यात ह्यामुळे शे. का. पक्षाला भगदाड पडल्याचं मला सांगितलं गेलं. प्रत्यक्षात, शे. का. पक्षाच्या नेत्यांना तसं वाटत नसल्याचं दिसलं. आ. दत्ता पाटलांनी, पेण तालुक्यातनं त्यांना आलेली पत्रंच मला दाखवली होती. 'भाई शेटे गेल्यामुळे, एक निष्क्रिय कार्यकर्ता निघून जाऊन संघटना अधिकच मजबूत झाली आहे असा आमचा दावा आहे...' पाटील म्हणाले 'भाई शेट्यांची किंमत मी तरी पाचशे मतांपेक्षा अधिक मानत नाही. तरीही त्यांच्यामुळे दोन हजार मते फुटतील असं मी हिशोबादाखल धरून चालतो.' ह्याखेरीज काही शे. का. पक्षाच्या कार्यकर्त्यांना, मी स्वतः ए. टी. पाटलांसाठी काम करताना पाहिलं. तर जि. प. अध्यक्ष वाजेकरही लौकरच काँग्रेसवासी होणार अशा वदंता आहेत. हे सगळं असूनही, माझ्या व्यक्तिगत मताप्रमाणे, शे. का. पक्ष हाच एकमेव संघटित पक्ष तिथे आहे; नि त्याच पक्षानं कार्यकर्त्यांचं जाळं खेड्यापाड्यातूनही सुंदर विणलं आहे. त्याच पक्षाची मोडतोड सर्वात कमी आहे; नि त्याचबरोबर, जुळी मुंबई, कोकण-विकास आदि प्रश्नांचं उत्कृष्ट भांडवल त्यांनी केलं आहे.

शे. का. पक्षाच्या मानानी नवकाँग्रेस जिल्ह्यात तरी अधिक विस्कळीत आहे. १९६७ मध्ये अविभक्त काँग्रेसच्या श्री. टी. बी. रणदिवे ह्यांचा नानासाहेब कुंट्यांनी शे. का. पक्षाच्या पाठिंब्यावर, ३४००० मतांनी पराभव केला होता. कुलाबा लोकसभा मतदार संघातल्या सहापैकी चार विधानसभा मतदार संघातनं शे. का. प. नं विजय मिळवला होता, तर फक्त दोनच जागा (महाड आणि श्रीवर्धन) काँग्रेसनं मिळवल्या होत्या. नंतर जिल्हा परिषद निवडणुकात पुन्हा एकदा शे. का. पक्ष न आपलं वर्चस्व अबाधित राखलं. अशा पद्धतीनं, गेल्या काही वर्षांपासनं तरी, काँग्रेसला ह्या जिल्ह्यात दुय्यम स्थान आहे. ह्यावेळी तर, काँग्रेस

विभागलेली आहे. त्यातच नवकाँग्रेसमध्येही अंतर्गत लाथाळी माजलेली आहे. नवकाँग्रेसचे अलीबाग, पेण, पनवेल, महाड येथील काही प्रमुख कार्यकर्ते मला नानासाहेब कुंटे किंवा ए. टी. पाटील ह्यांचं काम करताना आढळले. पेणमधल्या एका व्यापाऱ्यानं तर चक्कच सांगितलं 'नाईलाज होतो, म्हणून ह्यांच्याबरोबर काम करायचं. पण माझं व माझी काही खास मतं ए. टी. नाच मिळतील हे निश्चित.' त्यानं पुढे असंही सांगितलं की, 'अंतुलेसायबांबरोबर किंवा सावंतांबरोबर हिंडलो नाही, पैसा दिला नाही तर मी पार पार धुतला जायचा संभव आहे!' परंतु ह्या साऱ्यांवर मात करू शकेल अशी काही अस्त्रं कुलाबा नवकाँग्रेसकडे आहेत. पहिलं नि मुख्य म्हणजे इंदिराजी नि त्यांनी सामान्य जनांवर घातलेली भुरळ! ह्याचा एक उत्कृष्ट नमुना अलिबागेतल्या एका छोटयाशा हॉटेलमालकानं मला दिला. त्याला नुकतंच म्हणे धंदा वाढीसाठी बँकेकडनं लोन मिळालं होतं. तो म्हणाला, 'काय बाई आहे! बाई असून अतिशय दमानं काम घेते. एकेका भल्या भल्यांची तिनं वाट लावली आहे. तिचाच पक्ष निवडून येणार! बाकी सगळे लेकाचे पुचाट आहेत.' ह्याच शब्दांची, थोडया फार फरकानं अनेक ठिकाणी मला उजळणी ऐकायला मिळाली. अलिबागहून रेवसकडे जाताना किंवा पनवेलहून महाडकडे जाताना बसमधल्या सहप्रवाशांकडून, उरणहून मोरा बंदराकडे नेणाऱ्या टांगेवाल्याकडून, मी उतरलेल्या लॉजमधील 'पोऱ्या'कडून!!

ह्याशिवाय नवकाँग्रेसच्या उडया आहेत त्या, कुलाबा जिल्ह्याचे पालक-मंत्री बॅ. अंतुले ह्यांच्या जीवावर. श्रीवर्धनच्या ह्या आमदारानं कुलाब्यावर आपली उत्कृष्ट छाप पाडल्याचं ठायी ठायी जाणवून येतं. आजही, 'जुळया मुंबई'चा प्रश्न बनवून त्याचा फायदा उचलायचं शे. का. पक्षाचं धोरण लक्षात येताच, ना. अंतुल्यांनी उरणमध्ये 'जुळया मुंबई'विरुद्ध काँग्रेसची समिती तयार केली. स्वतःच्या नेतृत्वाखाली, मुख्यमंत्र्यांकडे शिष्ट-मंडळ नेण्याची घोषणा केली. ना. अतुल्यांच्या विरुद्ध अनेक अपप्रचारही ऐकू येतात. पूर्वाश्रमीच्या अनेक भानगडीच्याही सुरस हकिगती ऐकू येतात. कुलाबा जिल्ह्यातनं होणाऱ्या सोन्याच्या चोरटया आयातीशीही त्यांचा संबंध जोडला जातो; तर भाई शेटे ह्यांना काँग्रेसमध्ये घेण्यामागे 'बांद्रयाचे दुकान' आहे असाही आरोप त्यांचे विरोधक उघडपणे करतात. खरं खोटं विरोधक, भाई शेटे आणि ना. अंतुले ह्यांनाच माहीत! परंतु तरीही, जिल्ह्यावर त्यांनी आपली विलक्षण पकड बसवली आहे हे निश्चित. त्याचबरोबर जिल्ह्यासाठी ते काही ना काही धडपडत आहेत ही भावनाही लोकात घर करू लागली आहे हेही निश्चित! ह्या धडपडण्यात त्यांचा वैयक्तिक स्वार्थ कदाचित असेलही किंवा नसेलही. तो प्रश्न इथे अप्रस्तुत आहे. पण त्यांची पकड कुलाबा जिल्ह्यावर दिवसेंदिवस घट्ट होत आहे; आणि त्याचा फायदा नवकाँग्रेसला मिळाल्यावाचून राहणार नाही!! ह्याशिवाय, अन्य कोणत्याही विरोधकांना न

मिळणारा एक फायदा नवकाँग्रेसला इथे मिळणार आहे. ना. यशवंतराव चव्हाण, ना. नाईक, बाळासाहेब देसाई असे नेते प्रचारार्थ इथे येत आहेत. बड्या नेत्यांचा थोडासा तरी परिणाम सामान्य जनतेवर होतोच होतो. नि नेमका त्याचाच फायदा नवकाँग्रेसला मिळणार आहे. विरोधकांकडे असे मोठाले नेते प्रचारकार्यास्तव येण्यासाठी मोकळेच नाहीत ! नाही म्हणायला, ए. टी. पाटलांसाठी कदाचित श्री. बाळ ठाकरे येऊ शकतील एवढंच !!

वस्तुस्थितीचा हा अंदाज घेतला तर खरा सामना नव काँग्रेसचे आमदार शं. बा. सावंत आणि शे. का. पक्षाचे आमदार दत्ता पाटील ह्यांच्यातच आहे. असाच कुलाबा जिल्ह्यातल्या अनेक राजकीय निरीक्षकांचा, स्थानिक वृत्तपत्रांचा अंदाज आहे. परंतु उरलेल्या दोन गोटातही कमालीचा आशावाद असल्याचं मला जाणवलं. नानासाहेबांच्या वतीनं (आज नानासाहेब आघाडीतर्फे शे. का. पक्षीयाविरुद्ध निवडणूक लढवित असले तरी १९६७ मध्ये ते शे. का. पक्षाच्याच पाठिंब्यावर काँग्रेसला पराभूत करून निवडून आले होते !) जनसंघ, संघटना काँग्रेसचे कार्यकर्ते. काही थोडे शिवसैनिक प्रचार करीत असून अलिबाग, पनवेल, पेण, श्रीवर्धन वगैरे भागात त्यांना बरीच मत पडतील असं दिसतं. दोन स्थानिक वृत्तपत्रही नानासाहेब कुटचांच्या बाजूनं प्रचार करीत आहेत. परंतु तरीही त्यांच्या प्रचाराचा जोर फारसा कुठेच जाणवत नाही. त्यांचे कार्यकर्तेही फारसे कुठे दिसत नाहीत की, प्रचार फलकही दिसत नाहीत. त्यांचा बराचसा जोर व्यक्तिगत प्रचारावर दिसतो. तसे ते ठिकठिकाणी जाऊन भेटी घेत आहेत; छोटयाशा प्रचार सभा घेत आहेत. त्यांच्या अशाच एका भेटीत मी त्यांना पनवेल येथे भेटलो. निवडणुकीत मतदान कशा पद्धतीनं होईल ह्यासंबंधी काहीही मत व्यक्त करण्याचं त्यांनी नाकारलं. आपण म. गांधींचे पाईक असल्याचं सांगून, त्यावेळी अंगी बाणलेली तत्त्वे, स्वीकारलेल्या निष्ठा ह्यांचाच पाठपुरावा आपण करीत असल्याचं, करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. १९६६ मध्ये काँग्रेस सोडण्यासही हेच कारण घडलं. कारण मूळ काँग्रेस संघटनेत अनेक अनिष्ट प्रवृत्ती शिरल्या. सेवेपेक्षा सत्ता हाच काँग्रेसचा केंद्रबिंदू ठरला. ह्याशिवाय महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळातल्या काही घटनांचाही परिणाम झाला नि मी काँग्रेस सोडली.

पुढे बोलताना नानासाहेबांनी 'संविद' सरकारच निदान पुढील दहा वर्षे तरी भारतात राहणार ह्या मुद्द्यावर भर दिला. '१९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वीपासूनच हे मत मी सातत्याने मांडत आलो आहे. बदलत्या राजकीय चित्रामुळे 'संविद' आवश्यक ठरलं होतं; आजही ते अवश्यक आहे किंवा सध्याच्या परिस्थितीत 'संविद'शिवाय तरणोपाय नाही असं माझं मत आहे.'

उत्तर प्रदेश व अन्य ठिकाणचे 'संविद'चे अनुभव लक्षात घेता 'संविद' यशस्वी

पृष्ठ ४१ वर

# उपेक्षित नाट्यसंमेलन

कुर्ला. मुंबईच्या शीवेबाहेरचं एक बकाल गाव. दंग्याच्या दे–धमाल काळात ते कुविख्यात झालं. अगदी काल–परवापर्यंत कुर्ला म्हणजे मुसलमान वस्तीचा अड्डा असं समीकरण रूढ होतं. त्यामुळे निश्चितपणे असे हिंदू तिथे वस्तीला कधी गेलेच नाही. आसपास कारखानदारी फोफावल्यानंतर कामगार वर्ग वाढला हे खरं आहे. पण पांढरपेशा हिंदूंच्या सार्वजनिक सांस्कृतिक चवळवळीचं वारं कुर्ल्यावरून खळ-खळून असं कधीच वाहिलं नाही. मात्र तसं ते कायमचं पडून राहणंही शक्य नव्हतं. कारण ह्या आडवळणी गावातून वाहाणाऱ्या रेल्वेफाटयाच्या लगतचा एका हिरवा कोकणी कोपरा काही सुखवस्तू बाळबोध मंडळींनी नांदवायला सुरुवात केली. खाडीच्या पाण्याचा उपसा केला. टुमदार घरं बांधली. नारळाची, आंब्याची झाडं कोकणी काळजाचं इमान राखून लावली. 'ब्राह्मणवाडी' अशी पाटी लावून आपा-पले धोपटमार्गी संसार सुरू केले. मात्र ताटा–पाटापर्यंतच संसार मर्यादित केले नाहीत. कुर्ला ते बोरीबंदर असा आखीव प्रवास करणाऱ्या त्या मंडळींनी बाळबोध जीण रेटता–रेटता बालगंधर्वांचा नि राम गणेश गडकऱ्यांचा अभिमानही जोपा-सला. हे दोघेही दिग्गज कुर्ल्यात कधी फिरकले नाहीत. पण कुर्लेकरांनी मात्र 'राजहंस कला सेवा मंडळ' ही त्या नाटकवाल्यांचं कौतुक करणारी संस्था जन्माला घातली; गडकरी पुण्यतिथी म्हणजे आपला कुलाचारच आहे असं मानून गेली पंचवीस–तीस वर्षं उत्सव साजरे केले. मराठी नाट्य संमेलन आपल्या गावी भरावं म्हणून ह्या नाटकवेड्या मंडळींनी परिषदेच्या मागे सतत टुमणं लावलं. जुन्या नाटक मंडळ्यांचे नाटककार ठोसरकवी कुर्ल्यालाच घरवाडी करून राहीले होते. जुन्या नाटकवाल्यांना 'दत्तू पेंटर' ह्या नावाने परिचित आणि नव्यांना दत्तोपंत आंगे म्हणून माहित झालेल्या नटवर्यांचे बिऱ्हाडही कुर्ल्यातच होते. परंपरेचा हा हवाला ही पुढे करून झाला. पण उपयोग झाला नाही. कुर्ल्यासारख्या अवघड वस्तीत कोण कशाला येतो? कुर्लेकरांचं उमाळ्याचं आमंत्रण परिषदेच्या दप्तरात घुसमटत

राहीलं. इतरांच्या वर्ण्या लागल्या. खरं तर यंदाचं हे बावन्नावं संमेलन मुंबईत तिगस्ता बारसं झालेल्या नाटयनिर्माता संघाने आमंत्रित केलं होतं. पण त्या बारा भैय्यांच्या तेरा चुली झाल्यामुळे अब्रू जायची पाळी आली. शेवटी कावऱ्याबावऱ्या झालेल्या नाटयपरिषदेनेच कुर्लेवाल्यांसमोर ओंजळ पसरून तुम्ही कृपया यंदाचं नाटय संमेलन बोलावता काय, अशी आर्जवं केली. सर्व मानपान बाजूला सारून नाटकवाल्यांच्या नावाने कुंकू लावणाऱ्या 'राजहंस' मंडळाने तत्काळ होकार भरला. दोन महिन्यांचासुद्धा अवधि नव्हता. द्रव्य नव्हतं. सोयी नव्हत्या. होती फक्त जिगर आणि अजोड उमाळा. त्याच्या बळावर त्यांनी कुर्ल्यात मराठी नाटय संमेलनाचं बावन्नावं अधिवेशन भरवलं. कुर्ल्यात अधिवेशन भरलं.

पण कसं ?

तर, ज्यांच्या भल्यासाठी हा सगळा आतबट्टयाचा प्रपंच, त्या नाटय-व्यावसायिकांच्या पूर्ण उपेक्षेच्या हताश वातावरणात! नाटयव्यावसायिकांची कालक्रमणा सुकर व्हावी, त्यांचा भविष्यकाळचा निर्वाह सुखप्रद व्हावा, त्यांच्या मार्गातल्या जाचक अडीअडचणी संघटित प्रयत्नांनी दूर व्हाव्यात, म्हणून नाटय परिषद आणि संमेलन सतत कोशीस करतात. नाटयप्रयोगांवरल्या जाचक करमणूककराचं ओझं नाटयपरिषदेने झक्कू लावल्यामुळेच नाहीसं झालं हा इतिहास तर ताजाच आहे. हा करमणूक कर रद्द झाल्यापासूनच नाटकवाल्यांना चार चांगले दिवस दिसू लागले आहेत. 'अरे, मला मंत्री म्हणून निवडून द्या. मी करमणूक कर पुन्हा लादतो आणि नाटयव्यवसायात माजलेली बजबजपुरी पुरती नाहीशी करून दाखवतो' असं सांगत विद्याधर गोखले हिंडतात, हा भाग सोडा. पण निदान वरच्या श्रेणीतल्या नाटकवाल्यांना ह्या करमणूककराचं उच्चाटन झाल्यापासूनच ढेरीवरून हात फिरवायला येऊ लागला आहे हे सत्य आहे आणि ह्या सुगीचं पितृत्व संमेलनाकडेच जातं. पण 'चंद्रलेखे'चे मोहन वाघ हे निर्माते आणि संगीत खेळांच्या दौऱ्यांचे ठेकेदार नाना कोचरेकर, हे दोघेजण वगळता इतर कुणीही नाटय व्याव-सायिक संमेलनाच्या मंडपाच्या आजूबाजूलासुद्धा फिरकला नाही. कालेलकर, तेंडुलकर, कलगुटकर, पेंडसे, नवरे, कर्णिक, मतकरी, प्रभु, खरे, शिरीष पै, कामत, फडके, बल्लाळ वगैरे सर्व ठळक नाटयलेखक कुर्ल्यापासून हाकेच्या अंतरावर राहा-तात. पण त्यांच्यापैकी कुणीही हजेरीपुरतंसुद्धा आलं नाही. वसंत दुधवडकर तेवढे दिसले. पहिल्या दर्जाचे सोडा, पण दुसऱ्या, तिसऱ्या दर्जाचा एकही नट दिसला नाही. इतक्या नाटयस्पर्धा झाल्या, इतके हौशी लोक त्यात भाग घेऊन गेले, इतके परिक्षक नेमून झाले होते, पण त्यातल्या एकाही सोम्यागोम्याने आपला मुखचंद्रमा म्हणून कसा तो संमेलनात दाखवला असेल तर शपथ! म्हणजे अखेर साहित्य संघाच्या परिसरातल्या चार ठराविक लोकांचा विकएंड, अध्यक्षांचं वार्षिक अरण्य-रूदन आणि आमच्यासारख्या कशाचंच सोयरसुतक नसलेल्यांचं मोफत प्रीती भोजन

इतकंच संमेलनाचं रूप शिल्लक उरतं! चांदा ते बांदा अशी ज्या महाराष्ट्राची व्याप्ती आपण बढेजावाने सांगतो त्या नाटचवेड्या राज्यातून पाच पंचवीस प्रतिनिधीसुद्धा संमेलनाला येऊ नयेत? तेव्हा, कुर्ल्याचं हे नाटचसंमेलन म्हणजे प्रत्यक्षात ब्राह्मणवाडीतल्या उत्साही मंडळींच्या घरच्या कार्यात काही ठरीव पाहुणे मंडळींची करमणूकीची उपस्थिती, असंच चित्र दिसलं. असो; काढला एवढा गळा खूप झाला. गोवा–ग्वाल्हेरच्या संमेलनापासूनचीच ही रड आहे. ती विसरूया. कुर्ल्याच्या नाटचसंमेलनात चांगल्या गोष्टीही घडल्या.

शिरवाडकरांच्या पहाटेच्या वाऱ्यासारख्या शांत, शितळ व्यक्तीमत्वाने सर्वांच्या मनातली मरगळ पार धुवून टाकली. त्यांच्या ओझरत्या भाषणातूनही त्यांच्या विचारसृष्टीचे मणके घट्ट आहेत आणि भाषाकामिनी त्यांना वश आहे, ह्याचा प्रत्यय सतत येत होता. कानेटकरांना जवान व्यक्तिमत्त्व लाभलं आहे, त्याचाही प्रभाव पडला. त्यांनी अनेक प्रेरक विचार पेरले. त्यातले मुख्य असे :–

१. संगीत नाटकांकडे आपण अधिक अगत्याने लक्ष दिलं पाहिजे.
२. नाटचसंहितेच्या वह्या तपासणीचं सरकारी चेक नाकं बंद झालं पाहिजे.
३. नाटचनिर्मितीचा धंदा करणाऱ्यांनी, गेला बाजार त्या धंद्याचं तरी इमान पाळलं पाहिजे.
४. भारतीय भाषाभगिनीमधली नाटकं मराठी रंगमंचावर दिसली पाहिजेत.

ह्यातल्या क्रमांक दोनच्या सूचनेबद्दल हजर असलेल्यांना विशेष अगत्य दिसलं. पु. ल. देशपांडे आणि माधव मनोहर यांनी नाटचसंहितेवरच्या सेन्सॉर बोर्डावर कडाडून हल्ला केला. विशेष म्हणजे असा सेन्सॉर बोर्ड भारतातल्या कुठल्याही राज्यात नसल्याचं त्यांनी सांगितलं. माधव मनोहर म्हणाले, "ह्या सरकारी बोर्डाची स्थिती करुणास्पद आहे. 'गिधाडे' ह्या नाटकाच्या मूळ संहितेतले काही शब्दप्रयोग गाळावेत व नंतर प्रयोग करावा अशी त्यांनी निर्मात्यांना आज्ञा केली. पण डॉ. श्रीराम लागूंनी बाजी लावली आहे. ते नाटचसंहितेत बदल करायला अजिबात कबूल नाहीत. मूळ संहितेबरहुकूम ते प्रयोग करीत आहेत. परिणाम भोगण्याची त्यांनी तयारी दाखवली आहे. पण सरकारी बोर्ड त्यांचं काहीही करू शकलेला नाही!" अभिरूप लोकसभा आणि परिसंवाद ठीक झाले. ह्या दोन्ही कार्यक्रमांना ब्राह्मणवाडीतल्या रहिवाश्यांनी तोबा गर्दी केली. त्यामुळे हायसं वाटलं. संतोषाची दुसरी गोष्ट म्हणजे एकही मंत्री मंडपाच्या आजूबाजूला लुडबुडला नाही. त्यामुळे उपऱ्या संदेशांच्या माऱ्यातून उपस्थितांची सुटका झाली. हेही नसे थोडके!

संमेलनाध्यक्ष वसंत कानेटकर हे, शिरवाडकरांनी म्हटल्याप्रमाणे मराठी रंगभूमीच्या वसंतपर्वाचे प्रवर्तक आहेत. मराठीतच नव्हेत तर अनेक भाषांत त्यांची नाटकं गेली आहेत; गल्ला जमवून देत आहेत. आज ते लौकीक यशाच्या लाटेवर आरूढ झाले आहेत. त्यांचा हा नाटचप्रवास सफळ कसा झाला ह्याबद्दलच्या

कुतूहलाने मी त्यांच्याबरोबर दिड-दोन तास मोकळया गप्पा मारल्या. त्यातला काही भाग असा :

कानेटकर, तुम्ही म्हणे शंभरावर कथा लिहिल्या आहेत !

शभरावर नसतील. पन्नास-साठ भरतील. त्या पंधरा वीस वर्षांपूर्वीच्या काळातल्या आहेत त्या काळात नाटकांना भाव नव्हता. कथा–कादंबऱ्यांचा असा तो काळ होता. नावलौकीक मिळवायचा असेल त्याने कथा कादंबऱ्यांचीच वाट धरणं त्या वेळी भाग होतं. म्हणून मी कथा लिहिल्या. पण कथालेखन मला फार तापदायक झालं. मला ते मनासारखं जमेना. माझा कथा संग्रह निघाला नाही हे बरंच झालं.

कथा संग्रह काढण्याचा तुम्ही प्रयत्नच केला नाहीत ?

केला. पॉप्युलरच्या भटकळांना मी माझा कथासंग्रह काढता काय म्हणून पत्र टाकल. त्यांचं पत्र आलं की कथासंग्रह नको; कादंबरी द्या. म्हणून मी 'पोरका' ही माझी कादंबरी त्यांना दिली. त्यांचा अनुभव चांगला आला. तेव्हापासून तेच माझे एकमेव प्रकाशक आहेत.

त्याच्या अगोदर कुणीही प्रकाशक नव्हते ?

होते. सार्त्रच्या Chips Are Down ह्या कादंबरीचा 'तेथे चल राणी !' ह्या नावाने मी अनुवाद केला. नंतर 'घर'ही स्वतंत्र कादंबरी लिहिली. ही दोन्ही पुस्तकं पुण्याच्या कुलकर्णी ग्रंथागारने प्रसिद्ध केली होती. त्यानंतर भटकळ भेटले. आजतागायत तेच माझे प्रकाशक आहेत.

तुम्ही नाटकांकडे कसे वळलात ?

मी फार पूर्वी, म्हणजे कॉलेजात असताना रेडिओसाठी श्रुतिका लिहायचा. चाळीस साली. तेव्हापासून संवाद लेखनावर माझा हात बसला. 'पोरका' ह्या कादंबरीवर त्याचा परिणाम झाला. त्यातल्या एका प्रकरणात फक्त संवाद आहेत. ते लिहून घेत असताना माझी बायकोच म्हणाली की हे संवाद लिहिण्यापेक्षा तुम्ही सरळ नाटकच का नाही लिहित ? मी म्हटलं, नाटकाला कोण विचारतो ? पण तेव्हापासून नाट्यलेखनाचा मी विचार करू लागलो. मला नाट्यविषय सुचू लागला.

तुमचं पहिलं नाटक कुठलं ?

'वेड्याचं घर उन्हात." बारा तेरा वर्षांपूर्वी ते पी. डी. ए.ने रंगभूमीवर आणलं. फार पूर्वी 'सत्यकथे'त 'ओरंगजेब' नावाची मी एक गोष्ट लिहिली होती आणि 'किर्लोस्कर'मध्ये 'वेड्याचं घर उन्हात' ही गोष्ट लिहिली होती. त्या दोन्ही पूर्णतः वेगवेगळया गोष्टी होत्या. 'ओरंगजेब'मध्ये संगीताच्या नादापायी संसाराची धूळधाण करणाऱ्या स्वतःच्या बापाची धास्ती घेतलेल्या एका रूक्ष माणसाला आलेल्या मुलामध्ये पुन्हा संगीताचे वेड डोकावू लागलेले दिसते आणि तो अस्वस्थ होतो अशी कथा आहे. 'वेड्याचं घर उन्हात' ह्या कथेत एक माणूस

एका वेड्याला आपला हरवलेला भाऊच आहे असं मानून घरी आणतो आणि घरातल्या माणसांना त्याचा फार त्रास होतो असा कथाभाग आहे. ह्या दोन वेगवेगळ्या कथावस्तूंचं मिश्रण करून मी ' वेड्याचं घर उन्हात ' हे नवं नाटक लिहिलं. कथेत भेटणारा वेडा मी नाटकात ड्रीममध्ये टाकला, इतकाच फरक आहे. ते नाटक पी. डी. ए.ने राज्य नाट्यस्पर्धेत आणलं आणि परितोषिक मिळवलं. तेव्हापासून माझ्यावर यशस्वी नाटककार असा शिक्कामोर्तब झालं.

त्या नाटकात प्रमुख पात्राची भूमिका करायला डॉ. श्रीराम लागूंसारखा नट मिळाला हा एक शुभयोगच झाला म्हणायचा, नाही का ?

अर्थात ! योगायोगाचं महत्त्व फार आहे आयुष्यात. योग्य वेळी योग्य गोष्टी मिळत गेल्या की लेखकाचा नावलौकिक होण्याच्या दृष्टीने ते फार उपयुक्त ठरतं. मराठी रंगभूमीला चांगले दिवस येऊ लागण्याच्या मोक्यावरच माझं नाट्यलेखन सुरू झालं हाही योगायोगच ! समजा माझं नाटक रंगभूमीला वाईट दिवस होते, त्या काळात बाहेर आलं असतं तर त्याला काय भवितव्य होतं ? भाव्यांचं ' विषकन्या 'सारखे दर्जेदार नाटक रंगभूमीच्या अवनतीच्या काळात आलं आणि गारद झालं हा इतिहास पहा की. ' रायगड ' गोवा हिंदु असोसिएशनने काढलं हाही योगायोगच. म्हणून ते इतकं उत्तम चाललं. ' मास्तर एके मास्तर ! ' हे बाबुराव गोखल्यांकडे गेलेलं नाटक गोवा हिंदु असोसिएशनकडे जातं, तर त्याचे त्यांनी ' लेकुरे 'सारखे प्रयोग केले असते. तात्पर्य काय, योगाचा म्हणून काही महिमा आहेच. कधी काळी मी नाटककार होईन असं मला वाटलंसुद्धा नव्हतं. पण तुम्ही पाहाताच आहात, आज मी नाट्यसंमेलनाचा अध्यक्ष आहे !

तुम्हाला सर्वांत जास्त लाभदायक ठरलेलं नाटक कुठचं ?

' रायगड ' आणि ' अश्रूंची झाली फुले. ' आता ' अश्रू ' आधिक पुढे जाईल असा रंग आहे. ' मला काही सांगायचं आहे ' सुद्धा उत्तम चाललं आहे. हौशी मंडळींकडून ' प्रेमा तुझा रंग 'ला फार मागणी आहे.

तुम्ही ' रायगड 'कडे कसे वळलात ?

रियासतकारांचं ' राजा शिवाजी ' वाचताना त्या कथेतलं नाट्य सुचलं. गोवा हिंदु असोशिएशनपुढे मी सात आठ कथासूत्रं ठेवली. ते म्हणाले, आम्हाला ' रायगड ' पाहिजे. मी चार-पाच पानं लिहिली नि थांबलो. ' प्रेमा तुझा रंग कसा 'च्या हलक्याफुलक्या विनोदी संवादातून ऐतिहासीक भाषेत प्रवेश करणं कठीण गेलं. पाच-सहा पानानंतर काही सुचेना, तेव्हा असोसिएशनचे भिकू पै आंगले म्हणाले, आपण महाराजांच्या त्या वास्तूत जाऊन येऊ या. म्हणून आम्ही रायगडला गेलो. चांदणी रात्र गडावर काढली. एक वेगळीच नशा चढली. मग मी ' रायगड 'मय होऊन गेलो !

तुमची सगळी नाट्यरचना स्वतंत्र आहे ?

आहेच आहे. वाङ्मयचौऱ्याचा आरोप माझ्यावर कधीही झालेला नाही. माझ्या नाट्यसृष्टीत निव्वळ कल्पित असं काहीच नाही. घटना कुठे ना कुठे घडतात; त्या निरनिराळ्या काळी निरनिराळ्या ठिकाणी घडतात. मी त्यांची सांधेजोड करतो. त्यातून माझं नाटक उभं राहातं. 'प्रेमा तुझा रंग कसा' हे नाटक म्हणजे तीन वेगवेगळ्या व्यक्तींनी मला सांगितलेल्या स्वानुभवांचं मी कल्पकतेने बनविलेलं रसायन आहे.

तुम्हाला चढाओढीची, कॉम्पिटीशनची भिती वाटते ?

कधीच नाही ! उलट माझं तर असं म्हणणं आहे की एकाच कथासूत्रावर आम्ही चार-पाच नाटककारांनी नाटकं लिहावीत ! त्यात काहीच गैर नाही. प्रेक्षकांना जे आवडेल ते तरंगेल; नावडतील ती बुडतील. अत्र्यांच्या 'शिव समर्थ' चा आणि माझ्या 'तुझा तू वाढवी राजा'चा कथाविषय जवळपास एकच आहे. असं असायला काय हरकत आहे ? एकाच नाटकाचे तीन अंक तीन वेगवेगळ्या नाटककारांनी लिहून काढण्याचा प्रयोग झालेला आहे. आता एकाच कथासूत्रावर चार निरनिराळ्या नाटककारांनी स्वतंत्र नाटकं लिहून दाखविली पाहिजेत. जे गुणवान् असेल ते टिकेल.

गुणांची नेहमीच कदर होते ?

नक्की. गुण फार वेळ लपणार नाहीत. लाकूड पाण्याच्या तळाला किती वेळ राहील ? ते तरंगत तरंगत वर येणारच ! पण लोखंड मात्र तळच गाठणार. एखादा लेखक बुजरा, लाजरा असला, किंवा त्याला मुसंडी मारायला जमलं नाही तर त्याला पुढे यायला वेळ लागेल. पण कधी ना कधी तो पुढे येणारच !

नाट्यलेखनात तुम्हाला तडजोडी कराव्या लागतात ?

तडजोडी म्हणण्यापेक्षा अनेक हितसंबंध पहावे लागतात असं म्हणा. मित्रांच्या नाटककंपन्या असतात. आपला दर्जा सांभाळून त्यांना लाभदायक होईल असं लिहावं लागतं. नटमंडळी मित्र झालेली असतात. आपल्या भूमिकेला चांगले टाळ्या घेऊ संवाद असावेत असं त्यांचं सतत टुमणं असतं. त्यांचीही भीड मोडवत नाही. आपल्या नाट्यलेखनावर अनेकांचे संसार चालायचे असतात हे भान तर सदोदित ठेवावं लागतं. शिवाय, आपलीही पातळी सोडणं शक्य नसतं.

तुम्ही लिहिलं आणि ताबडतोब रंगभूमीवर आलं, असं होतं ?

आता होतं. पण माझं पहिलं नाटक 'वेड्याचं घर उन्हात' पी. डी. ए. कडे वर्षभर पडून होतं. मात्र त्यांनी ते स्वीकारल्याच्या पुढल्या वर्षी रंगभूमीवर आणायचं पक्कं केलेलं होतं. मी सुरवातीलाच व्यावसायिक रंगभूमीकडे न जाता प्रायोगिक रंगभूमीकडे गेलो ह्याचं प्रमुख कारण म्हणजे प्रारंभी मला नाव नव्हतं हे आहे. अगोदर मी प्रायोगिक रंगभूमीवर यश मिळवलं. नंतर व्यावसायिक रंगभूमीवर आलो.

तुमची नाटकं इतर भाषांमध्ये भाषांतरीत झाली आहेत ?

हो. हिंदी, गुजराती, कन्नड, पंजाबी, सिंधी, बंगाली वगैरे भाषांमध्ये माझ्या नाटकांची भाषांतरं यशस्वी ठरली आहेत. ' मला काही सांगायचं आहे ' तर प्रथम गुजराती रंगभूमीवर आलं नि मग चार–सहा महिन्यांनी मराठी रंगभूमीवर आलं.


तुमची सर्व नाटकं प्रकाशित झाली आहेत ?

फक्त ' मास्तर एके मास्तर ' तेवढं प्रकाशित झालेलं नाही. त्याची मी लिहिलेली वही, प्रयोगाची संहिता करताना कंपनीच्या बिऱ्हाडी इतकी बदलली गेली, की माझं मूळ हस्तलिखितच उरलेलं नाही. त्या नाटकाचा मी प्रयोगही पाहिला नाही. की तालीमही पाहिलेली नाही. त्या नाटकात मी शिक्षकवर्गाची क्रूर चेष्टा केली आहे असं म्हणतात ते चुकीचं आहे. आज शिक्षणसंस्थांचा कारभारच बरबटलेला दिसतो. मी त्या व्यंगाला फार्सिकल ट्रिटमेंट दिली. खरोखर, ते नाटक ' गोवा हिंदु 'कडे जायला हवं होतं. त्यांनी त्याचं सोनं केलं असतं.

नाट्यलेखनाबद्दलचे तुमचे भावी संकल्प काय आहेत ?

एक–दोन सामाजिक नाटकं लवकरच लिहायची आहेत. एक–दोन वर्षांनी मी कॉलेजमधून निवृत्त होऊन लेखनाला पूर्णतया वाहून घेणार आहे. म्हणजे वेळही भरपूर मिळेल. मनाप्रमाणे लेखन-वाचन करता येईल. मात्र, एकंदरीत पाहता मी यशस्वी आणि आनंदी आहे. कवी गिरीश माझे वडील. ते आता ऐंशी वर्षांचे झाले आहेत. आईचंही आता वय झालं आहे. दोघंही थकली आहेत. त्यांच्या डोळ्यासमोरच मी वाङमयाच्या क्षेत्रात यशवंत झालो, हे सुख आम्हा दोघांनाही आहे. एकूण, झाला हा प्रवास सुखाचाच झाला.

तथास्तु ! पण एवढ्याने भागतं ? नाही. कानेटकरांची आज वट आहे. तिच्या ताकदीवर आपल्या अध्यर्शीय कारकीर्दीत त्यांनी त्या कलाबाह्य आदेश देऊन छळणाऱ्या, पण सत्ता गाजविण्याचं त्राण अंगी नसलेल्या सरकारी सेन्सॉर बोर्डाचं पेकाट मोडलं पाहिजे, म्हणजे त्यांच्या यशाचा इतर नाटककारांना कायमचा फायदा झाला असं घडेल; तसं झालं तर कानेटकरांचं नाव कौतुकाने घेणारे उद्याचे नाटककार, त्यांचं नाव कृतज्ञतेने घेतील !





# एक फुलाची गोष्ट

महादेव मोरे

माझ्या ह्या जाण्यायेण्याच्या रस्त्यावरील, एक पाच मजली चाळ. मजला दुसरा. मधली खोली. समोरच्या गॅलरीत ती नेहमीच आढळते. वय बारा-तेराच असेल, नसेलही. बांध्याला अजूनीही स्कर्टचीच संवय. भरलेल्या उघडया पोटऱ्या-मांडया छातीवरचे कळे. कोवळे टपोरलेले. अशी ती. गोरी, बरी, नीटस, एक फुलच. भूलच-मनावर मनावर.

मी आपला टीपटॉपमध्ये नेहमीसारखाच. बोटात सिगार रोवलेली. पेटती. तशीच नजरही. केव्हा वर बघे. केव्हा नाही. तिची नजर माझ्यावरच रोवलेली. हे समजते. मग सवय होते...रोजच...एके दिवशी हासतो. अस्फूट. यावर तीही...अशी नजरेनजरेची ओळख – पसरत, साकळत जाणारी.

पण असा खेळ लांबविणं बरं नसतं. नव्हेही. मग त्याचाच कंटाळा येऊ लागतो. येतोही...म्हणून मी एके दिवशी तिच्या रस्त्यात उभा. ती हायस्कुलला जात असलेली.

"येतेस, चहा घेऊ ?" आणि खूप दिवसाची ओळख असल्याप्रमाणे हासतो.

' न...नाही...नको !" तिला हे सारं अनपेक्षित. बावचळते. घाबरतेही.

"का ?"

"कुणी पाहील..."

"तसा वेळ कोणाला आहे – पहात बसायला इथे ! चल..."

"नको. मी जात नाही हॉटेलात कधी..."

"नसेनास का, पण आज सुरुवात करायला काय हरकत आहे ? मुंबईत रहातेस, मुंबईकरांसारखी वाग की थोडी !"

आणि मग ती यावयास तयार होते. मागेपुढे, आजूबाजूस पहात झप्झप् चालू लागते. कुणी बघेल – ही धास्ती, भीती. चेहराही तसाच.

हॉटेल. फॅमिली रूम. ती संकोचून एवढीशी झालीय. नवी आहे. बुजणार अशीच...मग अशावेळी घडतं, तसं नि तसलंच बोलणं.

"काय घेणार ?"

"फक्त चहा. दुसरं काही नको !"

"पण मला हवं आहे ना !"

"पण...पण मी..."

अन् एवढ्यात वेटर आत डोकावतो. मी भरभर पदार्थांची ऑर्डर देतो. वेटर जाताच ती म्हणते,

"मी काही खाणार नाही हं – आताच सांगते !"

"बरं बुवा, खाऊ नकोस. घरी बांधून ने !" आणि मी हासू लागतो...

अशी सुरुवात. मग भीड चेपत जाते. मनाची. जनाचीही. ह्या मध्यमवर्गीय मुली. घरी समाधानापेक्षा शिमगाच जास्त. चमचमीत खाणं, आवडीचा चित्रपट पहाणं, मनासारखे कपडे वापरावयास मिळणं – सगळ्याचाच अभाव...तिच्याही अशा कोंडलेल्या इच्छा–आकांक्षा. पण आता वाट मिळालेली. तिला हवं ते खिलावतो, हवं तेथे घुमवितो. एखादा चित्रपटही टाकतो...तिच्या मनाला पंख फुटताहेत...एक नवं, अनोखं, तरीही हवसं वाटणारं जग तिच्या नजरेसमोर साकार झालेलं...

तिच्यावर एवढा खर्च करायला माझ्याजवळ पैसा काही उतू चाललेला नाहीय. माझीही प्रगती चालू आहेच. केव्हा फॅमिलीरूममध्ये, केव्हा बागेत, केव्हा चित्रपटगृहातील काळोखात...ह्या सर्व स्थानांचा अशासाठीच जास्त उपयोग...चुंबनालिंगनापर्यंत मजल...आणि मग एके दिवशी म्हणते,

"आपण पळून जाऊ या !"

अंगावर आल्यावर शिंगावर घेणं किती सोपं असतं...पाणी तुंबल्यावर कट्टा फुटायला वेळ लागत नाही ? म्हणून म्हणालो,

"चल ना, माझी काहीच हरकत नाही !"

'आज येते. संध्याकाळी येथेच – बागेजवळ !"


आणि खरंच ती येते...आठ दिवस असे नि कसे उडतात, समजत नाही...मग नव्याची नवलाई खलास होऊन जाते; नि ती म्हणजे एक बलाच वाटू लागते... आणखी म्हणजे, माझी नव्हे माझ्या बाची म्हणून ही खोली इतके दिवस आपण वापरलीय्. आजवर दिलावरखान गप्प बसलाय् हा त्याचा भलेपणा त्याची दोस्तानी सांभाळणं महत्त्वाचं. नाहीतर अशांसाठी पुन्हा ही मिळायची मुश्किल...विचार करून दिमाख खराब होऊन जायची पाळी...मग सुचतं; नि बरीच माथेफोड करून तिच्या बाला एक पत्र लिहतो–

"मिस्टर – तुमची पोर इथं माझ्याकडं आलीय्. हवी तर घेऊन जाणे. घरपोच करण्याची जबाबदारी माझ्यावर नाही. कारण कुणी कार्यकर्ता वा देशभक्त म्हणवून घेण्याची माझी इच्छा नाही, आणि लायकीही...आपली, आपल्या घराण्याची अब्रू, पोरीच भवितव्य अन् अशाच पुष्कळ गोष्टींचा विचार करून हे सर्व पोलिसात कळविलं जाणार नाही, अशी आशा करतो तसं काही केल्यास आपलंच जास्त नुकसान होणार आहे, हे लक्षात असू द्या. कारण माझ्यासारख्या लोफड माणसाचा नेहमीच एक पाय तुरुंगात, अन् एक बाहेर असतो...'

पत्र मिळताच तिचा बाप येतो. बरीच भकस करतो; आणि मुकाटपणे आल्या पोरगीला घेऊन जातो...कारण त्याचचं नाण खोटं ठरलेलं...

आणि ती...? तिच्याकडे मी पहातही नाही फुल चुरगाळल्यावर विखुरणाऱ्या पाकळ्यांकडे कुणी पहात नसते !

दोन दिवसांनी तिनं आत्महत्या केल्याचं समजतं. चला, तेवढाच, 'नियोजना'ला हातभार लागला ! तर आता ह्या नव्या रस्त्याने मी पाकोटमारंसाठी जातो. जवळच एक शाळा. शाळेत एक जवान मास्तरीन. मी जाळे टाकलेय्...



निवडणूक मतप्रवाह

# जाहीरनामे काय सांगतात, काय दडवतात ?

**वा. वा. रानडे**

राजकीय पक्षांचे निवडणूक जाहीरनामे हा निवडणूक मोहिमेतील केवळ एक उपचार झालेला आहे. जाहीरनामे वाचून कोणी मत देत नाहीत. फारच थोडया मतदारांनी ते वाचलेले असतात. पक्षाचे धोरण व कार्यक्रमातील महत्त्वाच्या बाबी पुढाऱ्यांच्या भाषणातून कळतातच. त्यासाठी जाहीरनामे वाचण्याची तसदी राजकीय अभ्यासकांशिवाय कोणी घेत नाही. ब्रिटनसारख्या पुढारलेल्या देशातसुद्धा बहुसंख्य मतदार जाहीरनामे वाचीत नाहीत असा एका पाहणीचा निष्कर्ष आहे, मग आपल्याकडेही तीच परिस्थिती असेल तर नवल नाही.

देशापुढील प्रमुख प्रश्नांबाबत निरनिराळ्या राजकीय पक्षांनी कोणती भूमिका मांडली आहे ? जाहीरनाम्यात काय सांगितले आहे व काय सांगण्याचे टाळले आहे किंवा दडवून ठेवले आहे ? प्रमुख राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यांचे विश्लेषण या दृष्टिकोनातून येथे करीत आहे.

घटनादुरुस्ती हा देशापुढील एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. किंबहुना मुदतपूर्व निवडणुकांचे ते एक महत्त्वाचे कारण आहे. संस्थानिकांची मान्यता काढून घेणारा राष्ट्रपतींचा हुकूम सुप्रीम कोर्टाने बेसनदशीर ठरविला नसता तर मुदतपूर्व निवडणुका झाल्याही नसत्या. घटनादुरुस्तीच्या प्रश्नावर निरनिराळ्या पक्षांची काय भूमिका आहे ? एका टोकाला सिंडिकेट काँग्रेस, जनसंघ आणि स्वतंत्र पक्ष यांना घटनादुरुस्ती नको आहे तर दुसऱ्या टोकाला संयुक्त समाजवादी पक्षाने घटना समिती बोलावून नवी घटना तयार करण्याची मागणी केली आहे. बाकीचे पक्ष या दोन टोकांच्या दरम्यान आहेत.

सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट गाठण्याच्या आड येणाऱ्या घटनेतील तरतुदी दूर करण्यासाठी आम्ही घटना दुरुस्ती करू एवढेच इंदिरा काँग्रेसच्या जाहीरनाम्यात म्हटले आहे, पण कोणत्या दुरुस्त्या करणार हे सांगण्याच्या बाबतीत मात्र मौन स्वीकारले आहे. जाहीरनाम्यात नसले तरी इंदिरा काँग्रेसला मुख्यतः दोन बाबतीत घटनादुरुस्ती हवी आहे, एक संस्थानिकांचे तनखे रद्द करण्यासाठी घटनादुरुस्ती आणि दुसरी मूलभूत हक्कांमध्ये बदल करण्याचा अधिकार पार्लमेंटला देणारी दुरुस्ती. यापलीकडे घटना दुरुस्तीच्या प्रश्नाचा अधिक गंभीरपणे विचार इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांपैकी फारसा कोणी केलेला नाही. कम्युनिस्ट व प्रजासमाजवादी हे इंदिरा काँग्रेसला जवळ असलेले पक्ष. त्यांनी घटना दुरुस्तीबद्दलची आपली भूमिका अधिक स्पष्टपणे मांडली आहे.

मूलभूत हक्कांच्याच अनुषंगाने मालमत्तेच्या हक्काचा प्रश्न उपस्थित झाला आहे. घटनेच्या मूलभूत हक्कांमध्ये मालमत्तेच्या हक्काचा समावेश आहे. मूलभूत हक्कांमधून हा हक्क काढून टाकावा अशी मागणी करणारी भाषणे इंदिरा काँग्रेसच्या काही नेत्यांनी केलेली होती. त्याचा फायदा घेऊन मालमत्तेचा हक्क इंदिरा काँग्रेस हिरावून घेणार असा प्रचार करण्यास विरोधी पक्षांच्या नेत्यांनी सुरुवात केली. याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली नाही तर मध्यमवर्गाची मते आपण गमावून बसू अशी भीती इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांना वाटू लागली. तेव्हा मालमत्तेचा हक्क आम्ही हिरावून घेणार नाही, उलट समाजाच्या मोठ्या थराला हा हक्क खऱ्या अर्थाने उपभोगता यावा अशी आमची भूमिका आहे. आमचा विरोध संपत्ती व मालमत्ता मूलभूत लोकांच्या हाती केंद्रित होण्याला आहे. त्यावर आम्ही निर्बंध घालू अशी भूमिका इंदिरा काँग्रेसच्या जाहीरनाम्यात मांडली आहे. कम्युनिस्ट पक्षानेही अशीच भूमिका घेतली आहे पण प्रजासमाजवादी पक्षाने मात्र या प्रश्नावर स्पष्ट मत व्यक्त केलेले नाही. संयुक्त समाजवादी पक्षाने मात्र मालमत्तेचा हक्क काढून टाकण्याची स्पष्ट मागणी केली आहे.

संस्थानिकांचे तनखे व खास हक्क रद्द करण्याप्रमाणेच आय सी. एस. अधिकाऱ्यांचे खास अधिकार, राज्यपालपद, वरिष्ठ सभागृहे रद्द करण्यासाठी घटना दुरुस्ती करावी. मूलभूत हक्कासंबंधीच्या घटनेतील प्रकरणात दुरुस्ती करून राष्ट्रीयीकरण झालेल्या मालमत्तेबद्दल नुकसानभरपाई काय द्यावयाची हे ठरविण्याचा अंतिम अधिकार पार्लमेंटला द्यावा. सुप्रीम कोर्टाच्या अधिकार कक्षेत हा हा विषय ठेवू नये अशी कम्युनिस्ट पक्षाची भूमिका आहे.

घटनेत कोणत्या दुरुस्त्या हव्या याचा विचार करण्यासाठी एक कमिशन नेमावे. मूलभूत हक्कात बदल करण्याचा अधिकार पार्लमेंटला असावा. नाथ पै यांनी यासंबंधी मांडलेले बिल पास व्हावे, सामाजिक आर्थिक सुधारणांच्या मार्गात येणारे अडथळे दूर करण्यासाठी घटना दुरुस्ती करण्याचा सार्वभौम अधिकार पार्लमेंटला

असावा. काम मिळण्याच्या हक्काचा समावेश मूलभूत हक्कांमध्ये व्हावा. अशी प्रजासमाजवादी पक्षाची भूमिका आहे.

घटना दुरुस्तीच्या अनुषंगानेच न्यायसंस्थेच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित होतो. न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य अबाधित असले पाहिजे असे सिंडिकेट काँग्रेस व स्वतंत्र पक्ष यांच्या जाहीरनाम्यात म्हटले आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या जाहीरनाम्यात मात्र असा प्रयत्न दिसतो. पार्लमेंटचे निर्णय सार्वभौम, त्यावर सुप्रीम कोर्टात अपील करता येणार नाही. एवढेच म्हणून पक्ष थांबलेला नाही तर पार्लमेंट किंवा विधानसभा यांनी मान्य केलेल्या पॅनेलमधून सुप्रीम कोर्ट किंवा हायकोर्ट जज्ज नेमण्यात यावे. जज्जांची संख्या किती असावी यावर काही बंधन असू नये. साध्या बहुमताच्या ठरावाने एखाद्या जज्जास अधिकार पदावरून दूर करण्याच्या अधिकार लोकसभेला असावा, मुख्य न्यायाधीशांची नेमणूक केवळ ज्येष्ठतेची कसोटी लावून केली जाऊ नये अशी भूमिका कम्युनिस्ट पक्षाच्या जाहीरनाम्यात मांडली आहे. प्रस्थापित हित-संबंध कायम ठेवावेत असा कल असलेल्या न्यायमूर्तींचे जागी सामाजिक-आर्थिक व्यवस्थेत जलद बदल घडवून आणले पाहिजेत असे मानणाऱ्या न्यायमूर्तींची नेम-


# साम्य आणि मुक्त निवडणुकीसाठी

सार्वत्रिक निवडणुकीत मतदान शांततेने, मोकळ्या वातावरणात व न्याय्य पद्धतीने व्हावे म्हणून सर्व प्रकारची व्यवस्था करण्यात येत आहे. मतदारांना धाकदपटशा दाखविणे किंवा दुसऱ्याच्या नावावर मतदान करणे या गुन्ह्यांबद्दल जबर शिक्षा देण्यात येईल.

तुमचा मतदानाचा हक्क न भिता व पक्षपात न करता बजवा. तुमचे मत गुप्त आहे.

हिंसेला घाबरू नका. शूर बना आणि हिंसेला विरोध करा.
मतदान करताना कोणताही मोबदला किंवा अमिष घेऊ नका.

तुमचे मतदान केंद्र जवळच आहे. उमेदवार किंवा त्याच्या एजंटांची वाहने वापरू नका.

**एक प्रौढ नागरिक या नात्याने मतदान करणे**
**हे तुमचे पवित्र कर्तव्य आहे. हे लक्षात ठेवा.**

**एस. पी. सेन वर्मा**
**भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त**

**davp 70/617**

णूक करण्यात यावी अशी स्पष्टच मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केली आहे. संयुक्त समाजवादी पक्षाच्या जाहीरनाम्यात यासंबंधी काही उल्लेख नाही. फक्त न्याय स्वस्त आणि लौकर मिळावा या दृष्टीने न्यायव्यवस्थेत बदल करण्यात येईल एवढेच त्यात म्हटले आहे.

काम मिळण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू असे सिंडिकेट काँग्रेस व जनसंघाने म्हटले असले तरी हा मूलभूत हक्क मानण्याची त्यांची तयारी नाही. कम्युनिस्ट पक्षानेसुद्धा मूलभूत हक्कात त्याचा समावेश केलेला नाही. प्रजा-समाजवादी व संयुक्त समाजवादी पक्षांनी मात्र त्याबद्दल आग्रह धरलेला आहे. कामाच्या म्हणजेच रोजगारीच्या हक्काशिवाय अन्न, कपडे, निवारा, शिक्षण व वैद्यकीय मदत यांचा समावेश मूलभूत हक्कात केला पाहिजे अशी संयुक्त समाज-वाद्यांची मागणी आहे.

घटना दुरूस्तीच्या संदर्भात आणखी एक महत्त्वाचा प्रश्न केंद्र राज्य संबंधाचा. राज्यांना अधिक आर्थिक अधिकार देण्याची मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट, संयुक्त समाजवादी व द्रवीड मुन्नेत्र कळघम यांच्या जाहिरनाम्यात केली आहे. केंद्र-राज्य संबंधातील संघर्ष दूर करण्यासाठी आंतर राज्य मंडळ नेमण्याची तयारी जनसंघाने दर्शविलेली आहे.

घटनेच्या खालोखाल किंबहुना तितकाच महत्वाचा विषय आर्थिक कार्यक्रमाचा. आर्थिक कार्यक्रमातील उद्दिष्टे साधण्यासाठी घटना दुरुस्तीची मागणी काही पक्षांनी केली आहे. त्याचा विचार वर केलाच आहे. गरीबी व बेकारी निवारणावर सर्वच राजकीय पक्षांनी भर दिला आहे. जे पक्ष सत्तेवर येण्याचा संभव नाही ते याबाबत वारेमाप आश्वासने देऊ शकतात कारण प्रत्यक्षात काही करून दाखविण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडत नाही पण जो पक्ष सत्तेवर येण्याची शक्यता आहे त्याला याबाबत व्यवहार्य भूमिका घ्यावी लागते. म्हणूनच अधिक रोजगाराच्या संधि निर्माण करण्यात येतील अशी मोघम भाषा इंदिरा काँग्रेसच्या जाहीरनाम्यात आहे. कम्युनिस्ट व प्रजासमाजवादी यांच्या जाहीरनाम्यातही अशीच मोघम आश्वासने आहेत. विशिष्ट मुदतीत विशिष्ट उद्दिष्ट आम्ही साध्य करू असा बांधून घेणारा कार्यक्रम यापैकी कोणत्याच पक्षाने मांडलेला नाही.

पाच वर्षात बेकारी हटविण्याचे आश्वासन जनसंघाने दिले आहे पण हे कसे साधणार? सर्वांना रोजगार देण्यासाठी नवे उद्योगधंदे उभारण्याकरता भांडवल उभारणी कशी करणार, याचा मात्र जनसंघाच्या जाहीरनाम्यात काही उल्लेख नाही. जनसंघ अण्वस्त्रे तयार करणार आहे. सर्व परदेशी मदत थांबवणार आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या जागी विकासाचा वेग १० टक्के ठेवणारी 'स्वदेशी' योजना जनसंघ देशापुढे ठेवणार आहे. विकासाचा १० टक्के वेग ठेवणे पुढारलेल्या राष्ट्रांना सुद्धा जमत नाही. आपल्या देशाचा जलद विकास करावयाचा तर धाडसी

कार्यक्रम हवा हे खरे पण तो कसा पार पाडावयाचा, भांडवल उभारणी कशी करावयाचो याची स्पष्ट रुपरेषाही हवी. जनसंघाने आर्थिक विकासाची सविस्तर योजना तयार केली आहे का ? केली असेल तर जाहिरनाम्याबरोबरच तीही लोकांपुढे का मांडली नाही ? आणि अशी योजना तयार नसेल तर आकर्षक आश्वासने देऊन मते मिळविण्याचा जनसघाचा हा प्रयत्न आहे असे कोणी म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

प्रत्येक नागरिकाला काम पुरविण्यासाठी एक हजार कोट रुपयांचा राष्ट्रीय विकास निधि उभारण्याची सूचना सिंडिकेट कांग्रेसच्या जाहीरनाम्यात केली आहे. स्वतंत्र पक्षाच्या जाहीरनाम्यातही अशाच प्रकारची सूचना थोडया निराळया स्वरूपात केली आहे. एक हजार कोट रुपयांचे अंदाजपत्रक असलेले आर्थिक रोजगार खाते निर्माण करण्यात यावे अशी स्वतंत्र पक्षाची मागणी आहे.

जनसंघ, व सिंडिकेट कांग्रेस, या पक्षांनी घरबांधणी कार्यक्रमावर भर दिला आहे. जनसंघाने प्रत्येक कुटुंबाला घर देण्याचे आश्वासन दिले आहे. सर्व कुटुंबांना घरे पुरविण्याचे आमचे उद्दिष्ट राहील व सुरुवातीस वर्षाला दहा लाख घरे बांधण्यात येतील असे सिंडिकेट कांग्रेसच्या जाहीरनाम्यात म्हटले आहे. बेकारी दूर करण्यासाठी स्वतंत्र पक्षाने रस्ते बांधणीचा कार्यक्रम सुचविला आहे. वर्षाला २५० कोट रु. या कार्यक्रमासाठी खर्च करण्यात येतील. त्यामुळे किमान दहा लाख लोकांना काम मिळून आणखी १७ लाख लोकांना रोजगाराची संधि उपलब्ध होईल असे स्वतंत्र पक्षास वाटते. निरक्षरतेचे दहा वर्षात उच्चाटन करण्याचा कार्यक्रम आखावा. त्यासाठी सुशिक्षित बेकारांची सेना उभारावी अशी संयुक्त समाजवादी पक्षाची सूचना आहे.

डाव्या पक्षांमध्ये निश्चित मुदतीला बांधून घेणारे कार्यक्रम संयुक्त समाजवादी पक्षानेच सुचविले आहेत. हे कार्यक्रम मुख्यतः शेतीच्या क्षेत्रात आहेत. ज्या राज्यांनी बिनकिफायतशीर शेतीवरील शेतसारा अजून रद्द केला नाही. त्यांना तो रद्द करण्यास नव्या केंद्र सरकारने अधिकारावर आल्यापासून दोन महिन्याच्या आत सांगावे. कुटुंबाच्या मालकीचे जमिनीवर कमाल मर्यादा घालण्याचा कार्यक्रम सहा महिन्यात हाती घेतला जावा. भूमिहीनांना जादा जमिनीचे वाटप करण्याचा कार्यक्रमही सहा महिन्यात घ्यावा असे जाहीरनाम्यात म्हटले आहे. पाटबंधारे योजनांसाठी सात वर्षाचा कार्यक्रम पक्षाने सुचविला आहे.

जमिन मालकीची कमाल मर्यादा कमी करण्यास सिंडिकेट कांग्रेस, जनसंघ व स्वतंत्र पक्ष यांचा विरोध आहे. कम्युनिस्ट पक्षाने तशी मागणी केली आहे. इंदिरा कांग्रेसच्या जाहीरनाम्यात मात्र या प्रश्नावर मौन पाळले आहे. हे मौन बोलके आहे. सधन शेतकरी वर्ग हा इंदिरा कांग्रेसचा मुख्य आधार आहे. कमाल धारणेची मर्यादा कमी करण्यास त्याचा विरोध आहे. या वर्गाला दुखविण्याची इंदिरा

काँग्रेसच्या नेत्यांची तयारी नाही.

भाववाढीस आळा घालण्याची, किमती आटोक्यात ठेवण्याची भाषा सर्वच पक्ष बोलत आहेत. पण इंदिरा काँग्रेसच्या तोंडी मात्र ही भाषा शोभत नाही कारण अधिकारावर असता त्यांना या बाबतीत अपयश आलेले आहे. तुटीचा अर्थभरणा कमी करणे. सरकारी खर्चाची उधळपट्टी थांबविणे हे उपाय बहुतेक पक्षांनी सुचविले आहेत. राष्ट्रपति भवन, राजभवने यांच्या व्यवस्थेवरचा खर्च कमी करावा अशी संयुक्त समाजवादी पक्षाची मागणी आहे.

शिक्षणाची पुनर्घटना करण्याची मागणी सर्वच राजकीय पक्षांनी केली आहे. पण या बाबतीत सर्वच राजकीय पक्ष दोषी आहेत. काँग्रेस पक्ष तर केंद्र सरकारमध्ये २३ वर्षे अप्रतिहत सत्ता भोगीत आहे पण कमिशने व समित्या नेमण्यापलीकडे त्याने याबाबत प्रत्यक्षात फारसे काही केले नाही. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर आठ राज्यात विरोधी पक्षांची सरकारे अधिकारावर आली होती पण त्यांनीही या बाबतीत काही कामगिरी केली नाही.

मतदानाचा हक्क सध्या २१ वर्षांवरील सर्व प्रौढांना आहे. तो १८ वर्षावरील सर्व प्रौढांना द्यावा अशी मागणी इंदिरा काँग्रेस सोडून बाकी बहुतेक सर्व पक्षांनी केली आहे.

सिंडिकेट आघाडीमधील चार पक्षांना हुकमी बहुमत मिळण्याची शक्यता नाही. पण समजा बहुमत मिळाले तर त्यांच्यात समान कार्यक्रम तयार होऊ शकेल का या दृष्टीने या चार पक्षांचे जाहीरनामे पाहिले तर सिंडिकेट काँग्रेस, जनसंघ आणि स्वतंत्र पक्ष यांच्या जाहीरनाम्यात बरेच साम्य आहे पण संयुक्तसमाजवादी पक्षाचा जाहीरनामा बऱ्याच बाबतीत निराळा आहे. अशा परिस्थितीत त्या पक्षाला आपल्या कार्यक्रमाचा आग्रह धरायचा असेल तर आघाडीतून बाहेर पडावे लागेल व आघाडीत रहायचे असेल तर कार्यक्रमास मुरड घालावी लागेल.

जनसंघाच्या जाहीरनाम्यात पडत गेलेला फरक लक्षात घेण्यासारखा आहे. जनसंघाने १९६२ च्या जाहीरनाम्यात युनिटरी राज्यपद्धतीची मागणी केली होती. १९६७ च्या जाहीरनाम्यात त्याचा ओझरता उल्लेख होता. पण यावेळच्या जाहीरनाम्यात त्यासंबंधी मौन आहे हिंदी व संस्कृतबद्दलचा आग्रह असाच कमी होत गेलेला आहे. हिंदीला राष्ट्रभाषेऐवजी 'दुव्याची भाषा' असा शब्दप्रयोग यावेळच्या जाहीरनाम्यात आहे. संस्कृत राष्ट्रभाषा असावी अशी जनसंघाची मागणी १९६२ मध्ये होती. १९६७ च्या जाहीरनाम्यात सरकारी समारंभांच्या प्रसंगी संस्कृत वापरावी येथपर्यंत हा आग्रह खाली आला व १९७१ च्या जाहीरनाम्यात तर संस्कृतबद्दल एक शब्द नाही. बिगर हिंदी भाषिकांची मते मिळविण्यासाठी जनसंघाने आपल्या भूमिकेत हा बदल केला आहे हे उघड आहे.

असे हे निरनिराळ्या पक्षांचे जाहीरनामे व त्यात सांगितलेल्या आणि दडविलेल्या गोष्टी.

□ □ □

 पृष्ठ ११ वरून

आहेत. आजच्या निवडणुकीच्या संदर्भातही ही परिस्थिती रंगा वैद्य आघाडीचे दृष्टीने गंभीर आहे. सोलापूर शहरात सुमारे दीड लाख मतदार आहेत हे विसरून चालणार नाही.

जिल्हा परिषद राजकारणाची स्थिती जरा वेगळी आहे. साठ सदस्य असलेल्या परिषदेत कॉंग्रेसचे सुमारे ४० सदस्य असून अन्य २० सदस्यांमध्ये शे. का. पक्षाची ताकद मोठी आहे. कॉंग्रेसच्या ४० सदस्यांमध्ये 'गटबाजी असून राजकीय साठमारीचे राजकारण चालू असते. नामदेवराव जगताप आणि शंकरराव मोहिते पाटलांचा गट, यांच्यातील खेळाचा लाभ कधी कधी विरोधी पक्षालाही मिळतो. सहकार समितीचे अध्यक्षपद या राजकारणापायी शे. का. पक्षाला मिळाले आहे.

तुळजापूर नगरपालिकेचे अध्यक्षपद शे. का. प. चे माणिकराव खपले यांच्याकडे आहे. नगरपालिकेतील सुमारे १५ ते २० सदस्य अपक्ष उमेदवार रंगा वैद्य यांना अनकूल आहेत. नागरिक आघाडीचे मळशेप्पा फिरजे अक्कलकोट नगरपालिकेचे अध्यक्ष असून २२ पैकी १७ सभासद रंगा वैद्य यांच्या उमेदवारीचा पाठपुरावा करणारे आहेत.

या मतदार संघाच्या विधान सभेतील जागांवर आर. व्ही. बेत (सोलापूर–नवकांग्रेस), वि. रा. पाटील (सोलापूर–हिन्दूमहासभा), व्ही. जी. शिवदारे (दक्षिण सोलापूर–नवकांग्रेस), ब्रह्मदेव माने (उत्तर सोलापूर), निर्मलाराजे भोसले (अक्कलकोट–संघटना कांग्रेस), शिवाजीराव पाटील (नवकांग्रेस) ही मंडळी प्रतिनिधित्व करत असून रंगा वैद्य यांच्यासाठी ब्रह्मदेव माने, व वि. रा. पाटील ही मंडळी झटून काम करीत आहेत. निर्मलाराजे भोसले संघटना कांग्रेसच्या असल्याने त्यांची सहानुभूती अर्थातच रंगा वैद्य यांच्या बाजूने आहे. उरलेले सर्व आमदार अधिकृत कांग्रेस उमेदवाराचा प्रचार करीत आहेत.

या मतदार संघातून लोकसभेवर १९५२ कै. शकरराव मोरे, (त्यावेळी शे का. पक्ष). १९५७ : बळासाहेब मोरे (शे. का. प). हे उमेदवार निवडून गेले. म्हणजे पहिल्या दोन्ही निवडणुका विरोधी पक्षाने जिकल्या. १९६२ साली ही जागा सोलापूरचेच अप्पासाहेब काडादी यांनी प्रथमच कांग्रेसला जिकून दिली. १९६७ ला वास्तविक पुन्हा काडादींना तिकीट दिले जायचे. एक तर ते कांग्रेसच्या ध्येयधोरणाविरूद्ध नव्हते. प्रदेश कांग्रेसला त्रास होईल असे कोणते खटयाळ कृत्य त्यांनी खासदारकीच्या काळात केले नाही. सोलापूरचेच रहाणारे असल्याने उमेद-

वारी लोकांनी मानली असती. लाखोपती असल्याने आर्थिक अडचणींचा प्रश्नच नव्हता. या पार्श्वभूमीवर आपल्याला तिकीट मिळेल असा त्यांना विश्वास होता. प्रदेश कॉंग्रेसने त्यांच्याकडून अर्ज मागवून घेऊन त्यांची उमेदवारी कोणतेही सबळ कारण नसताना नाकारली. कदाचित ते लिंगायत समाजाचे असल्याने आणि सोलापूर म्हैसूर प्रांताला लागून असल्याने सीमा प्रश्नाबाबत उगाच धोका नको, असा विचार झाला असावा. अर्थात सीमाप्रश्नाबाबत काडादींचे धोरण प्रदेश कॉंग्रेसशी नेहमीच सुसंगत होते. पाच वर्षांच्या खासदारकीमध्ये त्यांचे व्यक्तिगत महत्त्व वाढणार नाही अशी दक्षता प्रदेश कॉंग्रेसने त्यांच्या काही महत्वाच्या योजना नाकारून घेतली होती. त्यामुळे ६७ मध्ये काडादी नाही म्हटल्यावर चार जवळचे लोक आणि 'संचार'चा मित्रपरीवार सोडला तर त्यांची उमेदवारी नाकारली गेल्याची बोच विशेष जाणवली नाही.

काडादी गेले तरी प्रदेश कॉंग्रेसला निवडणुकीच्या आर्थिक आघाडीचे आधार-स्तंभ ठरणारे दमानि शेठ सोलापूर शहर मतदार संघासाठी निवडले गेले. हो ना करता करता मंडळींनी शेठजींसाठी काम केले, आणि शेठजी विजयी झाले.

आता चालू मुदतपूर्व निवडणुकीच्या वेळी, प्रारंभी सांगितल्याप्रमाणे सोलापूर शहर व जिल्हा कॉंग्रेसने सुचवलेली नावे नाकारण्यात आली आणि पुन्हा शेठजीं-चीच उमेदवारी लादली गेली. अंतस्थ प्रक्षोभ झाला. परंतु साहेबांनी डोळे वटार-ताच मंडळी कामाला लागली. शेठ दमानि समाजवाद आणण्याचे कंकण बांधलेल्या नव कॉंग्रेसचे उमेदवार म्हणून मिरवू लागले.

परंतु वातावरण थंडच होते. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस उजाडला. शेठजी आणि सोलापूर कॉंग्रेस आता मात्र हबकली. सोलापुरात सरळ सामना द्यावा लागणार आणि तोही रंगा वैद्य यांच्यासारख्या लोकप्रिय, चारित्र्य-वान, तळमळीच्या कार्यकर्त्यांबरोबर, याची कल्पना कुणालाच नव्हती. परंतु हा चमत्कार झाला. सहा उमेदवार आखाड्यात असताना कशीबशी जिंकलेली गेली निवडणूक आठवली आणि प्रसंग बाका आहे याचा शेठजींना अंदाज आला. बाईंच्या महाराष्ट्र दौऱ्यात त्यांनी सोलापूरला पायधूळ झाडली ती त्यामुळेच. सोलापूरला समाजवादाची नेहमीची रेकॉर्ड लागली. परंतु उमेदवाराचे नाव घेतले गेले नाही. प्रदेश कॉंग्रेसलाही सोलापूर लढतीचे महात्म्य पटले. त्यात विधानसभेच्या निवडणुका नसल्याने आमदार अंग मोडून प्रचार करीनात. हे लक्षात आल्यावर डायरेक्ट साहेबांकडून कानपिचक्या दिल्या गेल्या. १२ महिन्यांनी विधानसभेची निवडणूक आहे याची आठवण दिली गेली, थोडेफार मतभेद दाबले गेले काम झालेच पाहिजे, उमेदवार आलाच पाहिजे अशी भूमिका निदान 'बाहेरून' घेऊन मंडळी काम करीत आहेत.

# शेठ दमानि

सुरजरतन दमानि मूळचे राजस्थानातील बिकानेर येथे राहणारे. लहानपणी वडील वारल्याने व कुटुंबाच्या जबाबदाऱ्या लहान वयात स्वीकाराव्या लागल्याने शिक्षण अपुरे सोडून शेठजी मुंबईत आले. कापड-कापूस बाजारामध्ये त्यांनी कारकूनी कामास सुरुवात केली. सूक्ष्म निरीक्षण शक्ती, धंद्याची जन्मजात आवड, यामुळे त्यांनी स्वतंत्र धंद्याची योजना आखून एक मॅच फॅक्टरी सुरू केली. परंतु दिल्ली येथे त्यांनी जे कोल्ड स्टोअरेज सुरू केले तेव्हापासून त्यांच्या यशास चढती कमान लागली. कापड व्यवसायात शिरून त्यांनी मोठा लौकिक मिळवला. १९६० पासून मुंबईच्या सिम्प्लेक्स गिरणीची सूत्रे त्यांच्याकडे आहेत. श्री. दमानि नियंत्रित करीत असलेल्या उद्योगधंद्यामधून पाच हजारांपेक्षा जास्त कामगार कर्मचारी काम करीत आहेत. आपल्या उद्योगसमूहात कामगारांशी चांगले संबंध ठेवण्यात शेठजी यशस्वी झाले आहेत. यंदाचे वर्षी मिल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली आहे. १९३० पासून त्यांचे काँग्रेसशी संबंध आहेत.

असे हे शेठजी, नवकाँग्रेसचे उमेदवार म्हणून उभे आहेत. निवडणूक जड जाणार हे लक्षात आल्या दिवसापासून म्हणजेच रंगा वैद्य हे एकमेव उमेदवार आपल्या विरोधात आहेत, हे लक्षात आल्यापासून शेठजी सोलापूरात युद्ध जिंकण्याच्या हेतूने 'सर्व साधनसामग्रीसह' तळ ठोकून आहेत.

शेठजींना भेटण्यासाठी एका पत्रकार मित्राकडून मी फोन करवला.

उत्तर आले, शेठजी सोये है। दो घंटेके बाद कोशिश करना !

निवडणूक १५–२० दिवसांवर.

दुसरे उमेदवार रंगा वैद्य आणि त्यांचे साथीदार निवडणुकीसाठी अहोरात्र खपत आहेत. त्यांना बोलायला सवड नाही. मी स्वतः हे पाहतो आहे आणि इकडे शेठजी स्वस्थ आहेत, पुण्याहून मुद्दाम आलेल्या माणूस प्रतिनिधीला भेटू शकत नाहीत. मी काँग्रेस कचेरीला फोन करून एका स्थानिक पत्रकार मित्राकरवी भेटीची वेळ पुन्हा मागून घेतो.

काँग्रेस कचेरी भव्य आहे. घोषणांचे भले मोठे फलक लावून चारही बाजूला समाजवादी वातावरण तयार केले आहे. टाळी वाजल्यावर समोर येऊन हजर होईल, इतक्या जिप्स खाली उभ्या आहेत. अनेक खरे, खोटे, भाडोत्री, पोटार्थी कार्यकर्ते कचेरी-भोवती फिरत आहेत आणि उमेदवार–सो रहे है। दो घंटे के बाद फीर कोशीश करना ! निवडणुकीमध्ये पैशाची ताकद ही काय चिज असते याची येथे प्रचिती आली.

–शेठजींची झोप आवरली होती. चेहऱ्यावर सुस्ती होती.

'हाँ! तो आप कहाँसे आये है!' एक भली मोठी जांभई.

कसली मुलाखत घेणार कपाळ! सोलापूरात आणि विशेषत: ग्रामीण परिसरात जे दैन्य, अज्ञान पाहिले त्याचा आणि या उमेदवाराचा पुसटताही संबंध जाणवला नाही.

निद्राभंगाचे पाप पदरी घेतलेच होते तर चार–दोन प्रश्न विचारणे आवश्यक होते.

शेठजींना मराठी येत नाही. सर्व बोलणे–इंग्रजी व हिंदीतून झाले.

पहिला प्रश्न : शेठजी, इंदिराबाई ज्या समाजवादाचा आणि पुरोगामी विचार-सरणीचा पुरस्कार करतात त्यावर तुमचा खरंच विश्वास आहे का हो? (वास्तविक उत्तर माहित होते परंतु अगदी राहवले नाही.)

शेठजी : अर्थात. काँग्रेसच्या ध्येयधोरणावर, जाहीरनाम्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. जो कार्यक्रम अमलात आणता येईल, असाच कार्यक्रम आम्ही हाती घेतला आहे.

**प्रश्न :** बँक राष्ट्रीयीकरण झाले, संस्थानिकांचे तनखे गेले, उद्या काँग्रेसने कापड गिरण्यांचे राष्ट्रीयीकरण करायचे ठरवले तर तुमचे व्यक्तिगत धोरण काय राहील?

**उत्तर :** काँग्रेसला संमिश्र अर्थव्यवस्था अभिप्रेत आहे. या संकेताप्रमाणे कापड गिरण्यांच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रश्न उद्भवणार नाही. कारण आवश्यक गरजांचे उत्पादन खाजगी क्षेत्रात, जड व मलभूत गरजांचे सार्वजनिक क्षेत्रात, असे सध्याचे धोरण आहे. त्यातून गिरण्यांचा प्रश्न आलाच तर अंतर्गत चर्चेचे वेळी मी विरोध करीन. परंतु पक्षाचा अंतिम निर्णय जो असेल त्याला मी पाठिंबा देईन.

**प्रश्न :** स्थानिक लोकांकडून तुमच्याबद्दल पुष्कळ तक्रारी ऐकायला मिळाल्या. तसेच समाजाच्या मोठ्या थरामध्ये तुमच्या उमेदवारीबद्दल नाराजी आढळते. असे का व्हावे?

**उत्तर :** मला जे शक्य आहे ते मी मतदारांसाठी करतो. तक्रारी नोंदविण्यासाठी मी एक कायम स्वरूपाचे कार्यालय उघडले आहे. कोणीही त्याचा योग्य फायदा घेऊ शकतो. सोलापूरला विमानतळ मिळविण्यासाठी मी खटपट करतो आहे. येत्या दोन वर्षांत विमानतळ मिळून नियमित वाहतूक सुरू होईल. उद्योगधंद्याचे वाढीस त्याचा उपयोग होईल. येथील संस्थांना मी देणग्या दिल्या आहेत. अनेक मंडळींना काम–धंद्याला लावले आहे. वैशंपायन मेडिकल कॉलेजसाठी हॉस्पिटल काढण्याची योजना आहे. महिन्यातून मी एकदा तरी येथे येतोच.

शेठजींना कोणती तरी मिटींग असते. ते घड्याळात बघतात. बाहेर लांब सडक गाडी उभी असते. त्यांचा निरोप घेऊन मी निघतो.

शेठजींनी १९५७ ची निवडणूक राजस्थानातून जिंकली होती. म्हणजे आता-पर्यंत खासदार म्हणून त्यांनी ९ वर्षे काम केले आहे. इंडिकेट काँग्रेसचे ते खजिन-दार आहेत. दानशूर व्यक्ती म्हणूनही त्यांनी लौकिक मिळविला आहे. अनेक वेळा परदेश प्रवासाची संधी त्यांना मिळाली आहे. आपण ही निवडणूक जिंकू, असा त्यांना विश्वास आहे. त्यांचे वय ५८ वर्षांचे आहे.

# रंगा वैद्य

रंगा वैद्य. एक मध्यमवयी, प्रसन्न व्यक्तिमत्त्व. व्यवसायाने पत्रकार असलेले वैद्य, सोलापूरात सर्व थरात, सर्व जातीजमातींमध्ये प्रिय आहेत. अपक्ष म्हणून एका उमेदवाराचे नाव सुचवावे, अशी कल्पना ज्यावेळी पुढे आली, त्यावेळी प्रथम नाव पुढे आले ते वैद्य यांचे. 'दैनिक संचार'चे ते संपादक. परंतु दैनिकातील कर्मचाऱ्यांपासून ते त्यांच्याशी या ना त्या नात्याने संपर्क येणाऱ्या व्यक्तींपर्यंत ते परिचित आहेत रंगा, रंगाण्णा आणि अण्णा या तीन नावांनी.

निवडणूक लढवायची ठरवल्यावर त्यांना सर्वाधीक उणीव भासली ती पैशाची. परंतु निष्ठावान कार्यकर्त्यांचा आणि चाहत्यांचा संच त्यांची प्रचार आघाडी कौशल्याने संभाळतो आहे.

मी वैद्य यांना भेटलो त्यावेळी एक विद्यार्थी मिरवणूक संपवून ते नुकतेच मोकळे झाले होते. मी पुण्याहून मुद्दाम आलो आणि 'माणूस' त्यांच्या निवडणुकीत इतकी गोडी घेतो है पाहून त्यांना बरे वाटले. जी काही १५–२० मिनिटे त्यांच्या बरोबर घालवली त्यावरून हा कार्यकर्ता जिद्दीचा, निश्चित विचारसरणीचा आणि शब्दाला पक्का आहे अशी खात्री झाली.

'संसदीय लोकशाहीमध्ये, विशेषत: लोकसभागृहात अपक्ष उमेदवारांना स्थान आहे असे आपल्याला वाटते का? अपक्ष निवडणूक लढवण्याची पद्धती संसदीय लोकशाहीला हितकारक आहे काय?' मी विचारले. वैद्य म्हणाले; 'संसदीय लोकशाहीमध्ये अपक्षीयांना स्थान असू नये असे वाटते. तथापि आपल्या देशातील सध्याची परिस्थिती लक्षात घेता, संसदेमध्ये पक्षीय पातळीच्या कक्षेबाहेर राहून काम करणाऱ्या मंडळींची गरज आहे.' अपक्ष मंडळींचा गट दडपण आणून वैचारिक ध्रुवीकरणाच्या प्रक्रियेला गती आणू शकेल, असाही विश्वास त्यांना वाटतो.

आपण कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही पक्षात सामील होणार नाही असे आश्वासन मतदारांना देऊ शकाल काय?

—तसे आश्वासन मी आधीच देऊन बसलो आहे. माझी उमेदवारी या सुस्पष्ट मान्यतेवर आधारीत आहे.

कोणत्या पक्षाबद्दल विशेष सहानुभूती आहे?

—अनेक वर्षे कॉंग्रेस कार्यकर्ता म्हणून मी काम केले आहे. सर्वसामान्य माणसांसाठी झटणाऱ्या पक्षांबद्दल मला सहानुभूती आहे.

पत्रकारांकडून, वृत्तपत्र व्यवसायीकांकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत?

पत्रकार अभ्यासू असला पाहिजे, समाजाशी त्याचा सतत संपर्क असला पाहिजे,

आपण करतो तो व्यवसाय नसून समाजसेवा आहे ही दृष्टी त्याने काम करताना ठेवली पाहिजे. म्हणजेच आपला स्वतंत्रबाणा टिकविला पाहिजे. वृत्तपत्रांनी घटना व स्वत:ची मते यांचे मिश्रण करू नये. पक्षीय वृत्तपत्रे आणि व्यवसायी मर्यादा यामुळे या व्यवसायाचे स्वरूप सध्या तरी समाधानकारक वाटत नाही.

तुमच्या निवडणुकीसंबंधी तुमचा अंदाज काय आहे ?

मी स्वत: आशावादी आहे. मी यश मिळवीन असे वाटते.

## वातावरण वैद्यांना अनुकूल

सत्ता आणि संपत्तीविरुद्ध स्थानिक असंतोषातून निर्माण झालेल्या या संघर्षाचा निर्णय काय लागेल ? यासाठी आणखी तपशिलाचा मागोवा घेणे आवश्यक वाटते.

सोलापूर शहर मतदार संघ खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| सोलापूर शहर. शहराचे दोन्ही भाग. | १,५०,००० |
| उत्तर सोलापूर तालुका | ७९,५०० |
| दक्षिण सोलापूर तालुका | ७१,५०० |
| अक्कलकोट तालुका | ८३,००० |
| तुळजापूर तालुका | ८०,००० |
| सर्व मिळून मतदार आहेत सुमारे | ४ लक्ष ७० हजार |

मतदारांमध्ये सगळचात जास्त मते बहुजन समाजाची ती सुमारे २ लक्ष आहेत. लिंगायत सुमारे ४० हजार, मुस्लीम सुमारे ४० हजार. साळी सुमारे ३० हजार. ख्रिश्चन मतदार सुमारे ८ हजार. या मतदारांपैकी वैद्य यांना सगळचात जास्त त्रास होईल मुस्लीम मतांचा. लिंगायत मतेही जड जातील. मागासलेल्या जमाती, बहुजन समाज, बुद्धिजिवी वर्ग, यांचे वैद्य यांना भरपूर मतदान व्हावे अशी अपेक्षा आहे.

नरसिंग गिरजी, लक्ष्मी, विष्णु व दमानि शेठजींच्या बंधूंची जाम मिल, या चार गिरण्या सध्या चालू आहेत. त्यातील व साळी समाजाच्या सोलापूर आणि यशवंत या सहकारी सूत गिरणीचा कामगार वर्ग धरता जवळजवळ ३० हजार कामगार मत आहे. दमानि–वैद्य लढतीमध्ये वास्तविक हे सर्व मत वैद्य यांच्या मागे जायला हवे. परंतु जातींचे वर्चस्व, उजव्या कम्युनिस्टांनी दमानिंना दिलेला पाठिंबा यामुळे कामगार मतदान कसे करतील याचा अंदाज सांगणे कठीण आहे. भांडवलदार विरुद्ध श्रमजीवी पत्रकार या लढयामध्ये कम्युनिस्ट पक्ष वैद्य यांच्या मागे दिसायला हवा.

◻ या संदर्भात कम्युनिस्टांचे नेते कॉम्रेड मडूर यांचे म्हणणे असे की, जथे आम्ही स्वत: लढत नाही, तेथे आम्ही इंडिकेटला पाठिंबा देतो. या आमच्या राष्ट्रीय धोरणाला धरून इथला निर्णय आहे. शिवाय निवडून आल्यावर आपण इंडिकेट काँग्रेसमध्ये जाणार नाही असे धोरण श्री. वैद्य यांनी जाहीर केले आहे. तेव्हा त्यांना आम्ही पाठिंबा देऊ शकत नाही.

मला जी विशेष माहिती कळली ती अशी, की शेटजींनी कम्युनिस्टांना मुंबईतील त्यांच्या महत्त्वाच्या जागेबाबत सैल हाताने मदत केल्याने तिकडले ऋण पक्ष येथे फेडत आहे.

शहरामध्ये दयानंद, सिद्धेश्वर, वैशंपायन, ही तीन प्रमुख महाविद्यालये. विद्यार्थ्यांची एकूण संख्या ५-६ हजारांच्या घरात. विद्यार्थ्यांमध्ये वैद्य यांच्याबद्दल सहानुभूती भरपूर आहे. विद्यार्थ्यांमध्ये मतदार कमी असले तरी वातावरण निर्माण करण्यात विद्यार्थी फार मोठी कामगिरी बजावू शकतात. सोलापूरचा विद्यार्थी अजून फार दबलेला वाटतो. कदाचित शेवटच्या ४-६ दिवसात हा वर्ग महत्त्वपूर्ण काम करून जाईलही. याचा लाभ निश्चितपणे वैद्य यांना मिळेल.

रंगा वैद्य यांची सगळ्यात मोठी ताकद म्हणजे त्यांच्यामागे उभ्या असलेल्या विविध पक्ष संघटना. संघटना काँग्रेस, महासभा, जनसंघ, पी. एस्. पी. एस्. एस. पी, स्वतंत्र, शे. का. प., डावे कम्युनिस्ट या सर्वांनी एकमुखी पाठिंबा वैद्य यांना दिला आहे. विविध पक्षांची अनेक मंडळी आज त्यांच्यासाठी काम करीत आहेत.

शहराखेरीज जवळ जवळ ४०० गावांशी उमेदवाराला संपर्क साधणे आवश्यक आहे. वहाने आणि प्रचारसाधने या दोन्हीचा वैद्य यांना तुटवडा जाणवत आहे. जाणवणार आहे. या छोट्या छोट्या गावातील दरिद्री, अज्ञानी आणि त्यातच सुख मानणाऱ्या जनतेची या निवडणुका म्हणजे एक चेष्टा तर नाही ना, असे मात्र हिंडताना वाटायला लागते. निवडणुक १५ दिवसांवर येऊन शेटजी आराम करू शकतात, याचे कारण त्यांची ही 'ग्रामीण' आघाडी भक्कम आहे.

सोलापूरच्या परिसरातील दुष्काळी जनतेत निवडणुकीबद्दल उत्साह कमीच आहे. सवसाधारण परिस्थितीत ५०-५५ टक्के मतदान होणे कठीण. दुष्काळग्रस्त मंडळींना मतदानासाठी काढण्याचे अवघड जाते.

सर्व परिस्थितीचा सगतवार विचार केला तर वातावरण वैद्य यांना अनुकूल आहे असे वाटते. यशाची शक्यता त्यांच्या बाबतीत जास्त आहे. परंतु दीनदुबळी गरीब जनता–पैशाची जादू ! सोलापूरात हयात घालवलेली मंडळीही याबाबत आत्मविश्वासाने काही बोलू शकत नाहीत. मी तर एक बाहेरचाच.

◻ ◻ ◻

पृष्ठ १७ वरून

होत नाहीत असं वाटत नाही का ?

नानासाहेब म्हणाले, 'संविद अधिकारावर येत असताना प्रत्येक घटक पक्षानं स्वतःकडे अधिकाधिक सूत्र कशी येतील ह्या दृष्टीने पावलं टाकली नि म्हणून, उ. प्रदेशातलं पहिलं संविद मोडलं. डिफेक्शन्स वाढली. मध्यावधि निवडणुकांच्या वेळी मी चरणसिंगांना व जनसंघालाही सांगितलं होतं की 'संविद 'च्या स्वरूपातच निवडणुकांना सामोरे जा. तो सल्ला मानला नाही...त्यानंतर नवकाँग्रेस—भाक्रांद सरकार उत्तर प्रदेशात अस्तित्वात आलं.'

तुम्ही म्हणता ह्या सान्या कोलांटच्या उड्या नाही का वाटत ?

'पण मला तसं वाटत नाही. नवकाँग्रेसबरोबर सत्ताग्रहणाचे वेळी भाक्रांदने कसलाही करार केलेला नव्हता, तरीही सरकार कोसळू नये म्हणून चरणसिंगांनी शेवटपर्यंत धडपड केली. शेवटी ताटातूट झाली तेव्हा पुन्हा 'संविद' अधिकारारूढ झालं. त्याला भाक्रादनं मान्यता दिली ती राष्ट्रपती राजवट टाळण्यासाठी. कारण राष्ट्रपती राजवट म्हणजे दिल्लीचं शासन. त्यासाठी जनतेवर बोजा...'

जनसंघाबरोबरच्या सहकार्याबद्दल बोलताना ते म्हणाले, '.. मी एकट्याच्या बळावर निवडून येत नाही हे मला माहित आहे. ज्यांनी सहकार्याचा हात दिला त्यांच्या सहकार्यानेच मला पुढे जाणं भाग होतं. जनसंघानं, संघटना काँग्रेसनं मला सहकार्य दिलं आहे. काही बाबतीत त्यांच्या—आमच्या विचारात साम्य आहे. काही विरोध आहेत. पण शेवटी व्यक्ति व्यक्तित विरोध हे असणारच. पण म्हणून सहकार्य होणारच नाही असं नाही...त्यांचे आमचे विचार स्वच्छ आहेत. दिवसा समाजवादाच्या गप्पा मारून रात्री धनिकांकडून देणग्या मिळवून त्यांना सवलती देण्याचे इंदिरा गांधींचे उद्योग आमच्याजवळ नाहीत. हा खोटा बुरखा फाडून टाकण्याबाबत आमचं एकमत असल्यानं हे सहकार्य आहे. अधिकारावर आलो तर जुन्या 'संविद' अनुभवातून शहाणे होऊन स्थिर शासन आम्हीच देऊ...' भाक्रांद जाहीरनाम्यात उल्लेखिलेल्या अध्यक्षीय पद्धतीसंबंधानं विचारता, त्यांनी आपलं मत देण्याचं नाकारलं (No comments, he said.)

नानासाहेबांविरुद्ध सामान्य जनात बराच रोष आढळला. काहींनी मला प्रत्यक्षच सांगितलं की, 'ह्या माणसानी काय केलंय आमच्यासाठी ? खासदार होऊन दिल्लीला गेल्यापासून, ह्या मतदार संघाकडे नानांनी ढुंकूनही पाहिलं नाही. इथल्या प्रश्नांकडे आत्मियतेनं पाहणंही त्यांनी केलं नाही, सोडवायचा प्रयत्न करणं तर दूरच राहिलं.' शे. का. पक्षाच्या काही कार्यकर्त्यांनी, खुद्द श्री. दत्ता पाटलांनी सांगितलं की, नानांनी त्या सर्वांची फार फार निराशा केली. श्री. कुंटयांना हे ऐक-

वल्यावर ते म्हणाले, ' ही चिखलफेकीची भाषा तशी नवीन नाही. १९६७ नंतर मी काय केलं त्याचा इतिहास लोकसभेतल्या कागदोपत्री तुम्हाला सापडू शकेल. परंतु निर्देशच करायचा झाल्यास कोकण रेल्वेसाठी हालचाली चालू झाल्या, मुंबई ते कन्याकुमारी विभागातल्या सर्व खासदारांची स्थायी समिती त्यासाठी बनवली गेली, त्याला माझा हातभार लागला आहे. मुंबई–कोकण–गोवा रस्त्याला राष्ट्रीय हमरस्ता म्हणून मान्यता मिळवून दिली आहे व त्याच्या रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. पुणा–मुंबई रस्त्याचीही रुंदी दुपटीनं वाढवण्यात येत आहे. शिवाय करजा मांडवा, रेवस मोरा बंदराच्या विकासानाही गती दिली आहे... आता पाणी पुरवठ्याचा प्रश्न. हा प्रश्न सर्वस्वी महाराष्ट्र शासनाच्या कक्षेतला विषय आहे. तो महाराष्ट्र विधानसभेतच धसाला लावला पाहिजे. दिल्लीत ओरडून काय फायदा ?...' जुन्या मुंबईबद्दल बोलताना त्यांनी संबंधित नागरिकांच्या पुनर्वसनाची संपूर्ण व्यवस्था झाल्याखेरीज जमिनी घेतल्या जाऊ नयेत असं प्रतिपादलं. नुसत्या मोबदल्यानं हा प्रश्न सोडवता येणार नाही असंही त्यांनी सांगितलं.

खुद्द नानासाहेब किंवा त्यांचे प्रचारक कुणीच त्यांच्या विजयाबद्दल खात्री देत नाहीत. अलिबागच्या ' राष्ट्रतेज ' साप्ताहिकाच्या संपादकांना मात्र तशी बालंबाल खात्री वाटते. त्यांचं गणितही साधं आहे. ते म्हणतात. "विधानसभेच्या निवडणुका नसल्यानं, नेहमीचं उत्साही वातावरण सध्या नाही. त्याचप्रमाणे निवडणुकांचे वेळी ठिकठिकाणी लग्नांचे मुहूर्त आहेत. ह्या साऱ्यांमुळे मतदान जेमतेम ५०% होईल, व तेही शहरातनं जास्त होईल व हे मतदान नानांनाच होईल ह्याबद्दल शंका नाही." नानासाहेबांच्या गोटात इतरत्र मात्र असा जोरदार आशावाद नाही.

## ए. टी. पाटील

परंतु अपक्ष उमेदवार श्री. ए. टी. पाटील ह्यांना मात्र यशाची बालंबाल खात्री वाटते. ए. टीं.विषयी एक मात्र अवश्य सांगितलं पाहिजे की एक व्यक्ती म्हणून त्यांच्याविषयी सर्वत्र आदर आहे. विरोधकातही ते सच्छिल, व्यासंगी, विद्वान्, मनमिळाऊ म्हणून गणले जातात. कॉंग्रेस संघटनेत त्यांचं कार्यही आहे. ह्या साऱ्याच प्रत्यतर त्यांच्याशी बोलताना प्रत्यही येत होतं. परंतु तरीही त्यांना कॉंग्रेसमधून फुटून निघावं लागलं आणि स्वतंत्रपणे निवडणूक लढवावी लागली आहे 'शिवसेना' आणि कांबळे गटानं आता त्यांची उमेदवारी उचलून धरली आहे. शिवसेनेनं त्यांच्या प्रचारालादेखील धुमधडाका पद्धतीनं सुरुवात केली आहे. कुलाबा जिल्ह्यात रिपब्लिकन पक्षाचं जे काही कार्य आहे तेही कांबळे गटाचंच. बी. सी. कांबळे

ह्यांनी पाठिंबा दिल्यानं ती मतं एकगठ्ठा ए. टीं.ना पडतील. असा आशावाद ए. टीं. च्या कार्यकर्त्यांत आहे. ह्याशिवाय त्यांच्या कार्यासाठी गोळा झालेल्यात मार्क्सिस्ट्स्, शिवसैनिक, काँग्रेसी, रिपब्लिकन, शे. का. पक्षीय असे अनेकजण एकत्रित आल्याचंही दिसलं. ह्याच जोरावर ए. टीं.नी मला आत्मविश्वासानं सांगितलं, 'मी निवडून आलो आहे!'

ए. टीं.कडचा तास माझा मोठा छान गेला. त्यांची प्रत्येक प्रश्नाची छाननी करण्याची पद्धत मोठी आकर्षक व ठाम वाटली. साहजिकच मी त्यांना शिवसेनेच्या पाठिंब्या संबंधी विचारलं, 'मी प्रथमच सांगतो की, मी त्यांचा 'पुरस्कृत' उमेदवार नाही. कुठल्याही अटींशिवाय त्यांनी मला पाठिंबा दिला आहे. आता कुणी जर मला सांगितलं की, आम्ही तुझ्याकडे येणारच, तर काय मी त्यांना नको म्हणू शकेन. श्री. ठाकरे यांनी जेव्हा पाहिलं की, शिवसेनेमुळे मतविभागणी होऊन काँग्रेसच्याच यशाची शक्यता वाढणार आहे तेव्हा त्यांनी, असंख्य शिवसैनिकांच्या मतांची कदर करून मला पाठिंबा जाहीर केला. मी शिवसेनेची मदत मागितली नव्हती. तसा पाठिंबा मला शे. का. पक्षानंही देऊ केला होता, नाना कुंटेचांनीदेखील देऊ केला होता. पण त्या सर्वांची अट होती, मी त्यांच्या पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून तरी उभं राहावं किंवा निदान त्यांचं निवडणूक चिन्ह तरी स्वीकारावं आता कुणी म्हणतात, की मी नवकाँग्रेसकडे गेलो असतो तर त्यांनी मला उभं केलं असतं. पण मला हे नको होतं. शिवसेनेविषयीच बोलायचं झालं तर ज्या मूळ कारणासाठी शिवसेना निर्माण झाली त्यात गैर असं काहीच नव्हतं. घटनेच्या १९ व्या कलमानं देशातल्या कुठल्याही नागरिकाला कुठेही जाऊन कुठलाही व्यवसाय करण्याचं स्वातंत्र्य बहाल केलं आहे. परंतु ह्यामुळे जर स्थानिक रहिवाशांना परागंदा व्हायची पाळी येणार असेल वा तत्सम समस्या निर्माण होणार असतील तर त्याला पायबंद घालण्यासाठी आवश्यक ते उपाय योजण्याचे अधिकारही राज्य शासनाला घटनेच्या १६ व्या कलमाने दिलेले आहेत. आणि घटनेचा उपयोग जनतेच्या कल्याणासाठी व्हायला हवा. तसा तो झाला नाही तर तो घटनेचा उपमर्द ठरेल. घटनेला मी पाचवा वेद मानतो. त्याचा उपमर्द म्हणजे राष्ट्राचा, जनतेचा अपमान असं मी समजतो. माझी ही मतं १९६५ मध्ये, शिवसेनेच्या जन्मापूर्वी दोन वर्षं आधी मांडली होती. शिवसेनेच्या आवाजात त्याचंच प्रतिबिंब होतं. शिवसेनेच्या चळवळीत म्हणूनच, मला वाटतं, घटनाबाह्य असं काही नव्हतं. किंबहुना, घटनेनं सुपुर्द केलेल्या जबाबदारीचं पालन शासनानं न केल्यानंच 'शिवसेना' निर्माण झाली असं मी मानतो... शिवसेनेच्या नंतरच्या राजकारणाविषयी, त्यांच्या कृत्यांविषयी मला वास्तविक काही कर्तव्य नाही. परंतु तरीही मी असं विचारतो की, शिवसैनिकांची ही वागणूक, त्यांचं हे रस्त्यावर येणं ह्याला जबाबदार कोण? ह्या साऱ्याचं उत्तरदायित्व आपल्यावर, आपल्या समाजावरच आहे शासनावर आहे'

'आपण 'अपक्ष' म्हणून निवडणूक लढवीत आहात. अपक्ष म्हणून एकटी व्यक्ती लोकसभेत काही प्रभाव पाडू शकेल का? अपक्षाला काही कार्य करता येईल का?'

माझ्या ह्या प्रश्नावर हसून श्री. ए. टी. म्हणाले, 'बरंच काही करता येईल अपक्षाला सोमणसाहेब. माझं तर असं ठाम मत आहे, केवळ 'होय बा' पक्षीय सदस्यांपेक्षा प्रत्येक छोटया-मोठ्या प्रश्नावर जनतेचा आवाज सभागृहात उठवणारा जागृत अपक्ष उमेदवारच, लोकशाहीला उचलून धरीत असतो. प्रत्येक प्रश्नावर पक्षीय सदस्यात चर्चाविनिमय व्हावा, त्यातनं धोरण ठरावं हे लोकशाहीत अपेक्षित असतं. किंबहुना प्रत्येक प्रश्नाची सांगोपांग चर्चा करून मतं मांडणारे टिकाकारच लोकशाहीचे आधारभूत असतात. कुठल्याही चर्चेमध्ये भाग न घेता (चर्चा घडतच नाहीत!) केवळ नेत्याच्या (प्रधान मंत्र्यांच्या किंवा मुख्यमंत्र्यांच्या) मताबरहुकूम

## कुलाबा मतदार संघ

□ कुलाबा जिल्ह्यातल्या पेण, श्रीवर्धन, महाड, पनवेल, अलिबाग, व माणगाव ह्या सहा विधानसभा मतदारसंघांचा ह्या लोकसभा मतदारसंघात अंतर्भाव असून, एकूण मतदार संख्या ५ लक्ष आहे. गेल्या सार्वत्रिक निवडणुकात हीच मतदार संख्या ४॥। लक्ष होती.

□ ह्या सहा मतदार संघापैकी चार मतदार संघातून पेण, पनवेल, अलिबाग, माणगाव—शे. का. पक्षाचे आमदार १९६७ साली निवडून आले होते. तर ऊर्वरित दोन जागा अविभक्त कॉंग्रेसने जिंकल्या होत्या. 'शेकाप'च्या वरील चार पैकी श्री. शेटे ह्यांनी अलिकडेच राजिनामा देऊन नवकॉंग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

□ यंदाच्या लोकसभेसाठीच्या निवडणुका रिंगणात उतरलेले चौघेही उमेदवार पेशाने वकील आहेत. त्यातले दोघे —श्री. शं. बा. सावंत, नवकॉंग्रेस व श्री. दत्ता पाटील, शे. का. पक्ष हे विद्यमान आमदार आहेत. श्री. नानासाहेब कुंटे हे विसर्जित लोकसभेतले कुलाब्याचे खासदार आहेत. तर श्री. ए. टी. पाटील हे भूतपूर्व कॉंग्रेस आमदार आहेत. श्री. दत्ता पाटील वगळता इतर तिघंही कधी ना कधी कॉंग्रेसच्या व्यासपीठावर एकत्रित आलेले होते.

□ ह्या मतदारसंघाने आतापर्यंत सातत्याने एकाच पक्षाला असे कधीही निवडून दिलेले नाही. इथले प्राबल्य क्रमाक्रमाने कॉंग्रेस, शेकाप ह्यांच्यात फिरत राहिले आहे. १९५२ ला ह्या मतदारसंघातनं कॉंग्रेसतर्फे श्री. सी. डी. देशमुख निवडून गेले. १९५७ ला संयुक्त महाराष्ट्राच्या वावटळीत इतर

माना डोलावणारे पक्षीय सदस्यच लोकशाही रचनेला सुरुंग लावीत असतात... एकच उदाहरण देतो. १९५६ साली कोकणच्या तिन्ही जिल्ह्यांविषयी व संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाविषयी, काँग्रेस आमदार असूनही, आदेशाविरुद्ध आवाज प्रथम मी उठवला होता. विरोधी मत मी नोंदवलं होतं. त्यावेळी संघटनेच्या विरोधात गेल्यामुळे मी एकाकीच झालो होतो; व माझा आवाज अपक्षाचाच बनला होता. परंतु नंतर प्रयत्नपूर्वक मी कोकणातल्या इतर तेरा आमदारांची मतं वळवली. माझा आवाज दिल्लीला पोचला. केंद्राला दखल घ्यावी लागली. सी. डीं.नी मला शाबासकी तर दिलीच पण ह्या संबंधात आपण दिल्लीला हालचाल करू असही आश्वासन दिलं. ह्या संबंधात त्यांनी प्रयत्नही केला...सांगायचा उद्देश एवढाच की, अपक्ष उमेदवारही पुरेसा जागृत असला तर तो एकटाही बरंच काही करू शकेल.'

---

## काही आकडेवारी

ठिकाणांप्रमाणे इथंही काँग्रेसची धूळधाण उडाली. १९६२ मध्ये पुन्हा इथली जागा काँग्रेसने जिकली तर, १९६७ मध्ये पुन्हा श्री. कुंटे हे शे. का पक्षाच्या पाठिंब्यावर काँग्रेसच्या श्री. रणदिव्यांचा पराभव करून निवडून आले.

मतपेटीनं असाच कौल विधान सभा, जिल्हा परिषद आदि निवडणुकां-तून दिला होता.

□ १९६७ च्या मतदानाचे आकडे असे होते—

| | | |
|---|---|---|
| एकूण मतदार | ४,८०,००० | |
| मतदान | ३,४८,००० | |
| बाद मतं. | ३५,६४४ | |
| श्री. नानासाहेब कुंटे (अपक्ष, शे. का. प. पुरस्कृत) | १,६४,४६४ | ५२·५ टक्के |
| श्री. टी. बी. रणदिवे (काँग्रेस) | १,२९,६५६ | ४१·७ टक्के |
| श्री. ओक (जनसंघ) | १८,१६६ | ५·८ टक्के |
| | ३,१२,३५६ | |

माणगाव, पनवेल, पेण आणि अलिबाग ह्या चार विधानसभा मतदार संघातून श्री. कुंट्यांना लीड मिळाला होता; तर श्रीवर्धन व महाड इथून श्री. रणदिव्यांना.

---

'...त्यावेळी जनतेच्या भावनांना जागून, आदेशविरुद्ध बंड पुकारलं. आजही माझं अंत:र्मन मला अशाच कारणांनी कॉंग्रेस बाहेर पडून निवडणुक लढवायला सांगत आहे. माझ्या कार्यकर्त्यां मित्रांचा आग्रह आहे; जनतेचा पाठिंबा आहे.'

जुळ्या मुंबईच्या प्रश्नाविषयी बोलताना श्री. ए. टी. पाटलांनी पुन्हा घटनेकडे बोट दाखवलं. ते म्हणाले, 'ह्या प्रश्नाविषयी माझ्या भूमिका स्पष्ट आहेत नि त्या मी वेळोवेळी मांडल्याही आहेत. ज्यांच्या जमिनी तुम्ही घेणार त्यांच्या पुनर्वसनाचा, जमिनीच्या निव्वळ मोबदल्याच्या नव्हे–प्रश्न पूर्णपणे सोडवल्याशिवाय, त्या जमिनी ताब्यात घेण्याचा अधिकार शासनाला नाही असं माझं ठाम मत आहे. इथल्या जनतेच्या वृत्ति, ह्या नवीन शहरामुळे बदलून जाणार आहेत. नवीन शहरी परिस्थितीशी जुळवून घेताना त्याला जड जाणार आहे. अशा वेळी जमिन हे त्याचं उदरनिर्वाहाचं साधन तुम्ही त्याच्या हातून हिसकावून घेणार आहात. त्याला नवीन साधनांची ओळख करून दिल्याशिवाय, त्या साधनातून त्याचा चरितार्थ चांगला चालतो हे पटवून दिल्याशिवाय त्याचं उदरनिर्वाहाचं साधन हिरावून घेण्याचा अधिकार शासनाला नाही असं माझं ठाम मत आहे. घटनाही तसंच सांगते. त्याविरुद्ध शासनानी योजना आखली तर, आपण विधिमंडळात जावं, सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागावी. ह्या सर्वच ठिकाणी अपयश आलं तर मग जनतेकडे जावं. हेच मत मी सर्वत्र मांडत आलो नि आताही तेच सांगतो...

'निवडून आल्यावर आपल्याकडे काही खास कार्यक्रम आहे का? विशेषत: कुलाबा जिल्ह्याच्या प्रश्नासंबंधात?'

'मी निवडून तर येऊ द्या आधी. पण आलो असं जर मानलं तर पहिला प्रयत्न मी करीन तो म्हणजे ह्या जिल्ह्यात होणाऱ्या चोरट्या आयातीच्या प्रकारांना आळा घालण्याचा. कितपत यशस्वी होईन ते सांगता येत नाही; पण धडक जरूर मारीन. नंतर पाणी, रस्ते, शिक्षण वगैरे समस्या आहेत. पण चोरट्या आयातीच्या प्रश्नाला मात्र प्रथम हात घालायचा प्रयत्न करीन, कारण तो प्रकार आत्यंतिक राष्ट्रद्रोही आहे. गावठी हातभट्टीच्या भट्ट्या चोरून लावणं हे सुद्धा मी एकवेळ समजू शकेन. पण ही कृत्यं मात्र फारच भयानक आहेत. त्यात कोण कोण गुंतले आहेत त्याचा अंदाज तुम्हाला आहेच...'

ह्या चोरट्या आयातीसंबंधी पनवेलच्या शिवसेना कार्यालयातही बरंच काही ऐकायला मिळालं. तिथले शाखाप्रमुख श्री. दत्ता जाधव ह्यांनी तर पुढे जाऊन असंही सांगितलं की, शिवसेना ह्या साऱ्यांच्या मुळाशी धडक मारून सगळी पाळंमुळं खणून काढील. त्यांच्या मते एस्. टी.च्या 'रातराण्यां'चा असल्या कृत्यांसाठी व्यवस्थित उपयोग करून घेतला जातो...

शिवसेनेच्या कार्यालयात, एटींच्या कचेऱ्यांत एटींच्या विजयाविषयी बरीच खात्री आढळते. कुलाबा जिल्ह्यांतल्या निरिक्षकांना, पत्रकारांना मात्र तशी खात्री वाटत

नाही. त्यांच्या मते एटींच्या मुळे शेकापची मतं मात्र विभागली जातील आणि नव-काँग्रेसच्या दृष्टिपथात विजय येईल.

■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■

## दत्ता पाटील

■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■

पण प्रत्यक्ष शेतकरी कामगार पक्षाच्या कचेऱ्यांतनं मात्र आ. दत्ता पाटलांच्या विजयाविषयी जबरस्त आत्मविश्वास आढळतो. अलिबागच्या त्यांच्या निवडणूक कार्यालयात श्री. दत्ता पाटलांना भेटताक्षणी त्यांनी मला ठामपणे सांगून टाकलं– " विजय माझा आहे नि तोही निश्चित आहे. एवढंच नाही तर माझ्या निकटवर्ती प्रतिस्पर्ध्यापेक्षा मला तीस हजार मतं जास्त मिळतील हेही मी तुम्हाला सांगून टाकतो आणि क्रमच लावायचा असेल तर ताही लिहून घ्या– १. दत्ता पाटील. २. श. बा. सावत. ३. ए. टी. पाटील आणि ४. नाना कुंटे. कुंटचांनी आपलं डिपॉझिट परत मिळवलं तरी फार झालं. " आपलं हे मत पटवून द्यायच्या दृष्टीनं त्यांनी काही गणितही मांडलं. त्यांच्या मते, " पूर्वी काँग्रेसविरुद्ध जेवढे उमेदवार जास्त तेवढा काँग्रेसचा फायदा अधिक असं समीकरण मांडलं जात असे. आज तेच समीकरण मी माझ्या बाबतीत मांडत आहे. जेवढे उमेदवार अधिक तेवढ्या अधिक मतांनी मी निवडून येईन...शिवाय काँग्रेसच्या बालेकिल्ल्यातनं आम्ही आत आत घुसलो आहोत. काँग्रेसला मुसलमानांची मतं पूर्वी खात्रीची वाटायची. आज परिस्थिती बदलली आहे. मुसलमानांनी हे जाणलं आहे की त्यांचं संरक्षण आम्हीच जास्त चांगलं करू शकतो. भिवंडी दंगलींच्या वेळी ह्याचं प्रत्यंतर त्यांना आलं आहे. म्हणूनच ही मतं आज आमच्याकडे वळली आहेत..."

इंदिराजींच्या आवाहनाचा निवडणुकीवर कितपत परिणाम होईल ह्याविषयी शंका व्यक्त करताना ते म्हणाले ' बाईंचा समाजवाद नकली आहे असं माझं ठाम मत आहे. समाजवादाच्या बुरख्याआडून त्या गरीबांची अधिकाधिक पिळवणूक करतील...बावीसशेच्या बावीस हजार जीप्स, प्लेन्स, हेलिकॉप्टर्स ही काय समाजवादाची लक्षणं मानायची ?' हाच मुद्दा एटींनीही उपस्थित केला होता. ' २५–५० हजाराशिवाय निवडणूक लढवता येत नाही तिथं कसल्या समाजवादाच्या आणि सामान्य जनतेच्या गप्पा मारता ?' असं एटी म्हणाले होते. चर्चा पुढे चालू ठेवताना श्री. दत्ता पाटील म्हणाले, ' बाईंचं आवाहन, तत्त्वज्ञान इथे डोक्यावरून जातं. इथं पाहिजे कार्य. शेकापचं तसं कार्य इथं आहे. कुलाबा जिल्ह्यातल्या जनतेच्या नसानसातून शेकापचा लाल झेंडा लहरतो आहे. समाजवादांच्या गप्पा मारून

संन्याच्या चोरट्या आयातींना पाठीशी घालणारे कसला समाजवाद इथे आणणार ?...

शिवसेनेचा विषय निघाला असता श्री. दत्ता पाटील म्हणाले, ' ह्या बाबतीत मला शासनाला प्रश्न विचारायचे आहेत. बाळ ठाकरे यांची प्रत्येक प्रश्न रस्त्यावर सोडवण्याची भाषा शासन किती दिवस ऐकून घेणार ? की शासनाला जुनी सरंजामशाही पुनरुज्जीवीत करायची आहे ? ठाकऱ्यांनी सेना बाळगावी; डांग्यांनी बाळगावी; धुळपांनी बाळगावी. प्रत्येकांच्या सेनेनं बाहेर पडावं, दुसऱ्यांच्या प्रदेशात जाऊन मुलुखगिरी करून यावी असं का शासनाला हवं आहे ? तसं असेल तर आम्ही तयार आहोत. पण एक मात्र निश्चित की, कुलाबा जिल्ह्यात, मुंबईप्रमाणे शिवसेनेची दादागिरी आम्ही चालू देणार नाही......'

' निवडून आल्यावर अर्थातच आम्ही पुरोगामी मतांचा पाठपुरावा करणार. त्याचबरोबर, ज्या पद्धतीनं मी तालुक्याची संघटना बांधली त्याच पद्धतीन मी जिल्ह्याची बांधेन; आणि मी आश्वासन देतो की पूर्वीच्या चारी खासदार पेक्षा मी स्वतःच वेगळेपण सिद्ध करीन, कुलाबा जिल्ह्यातल्या जनतेच्या अपेक्षा पुऱ्या करीन...

निवडणुकातनं जातीय वाद खूपच महत्वाचा परिणाम घडवून आणेल असं मला अनेकांनी सांगितलं. ह्या मतदार संघात आग्री जमातीच प्राबल्य शे. का. पक्षात तेच बहुसंख्य. ब्राह्मण थोडे व तेही बहुतेक विरोधात. परंतु जनतेची ही भिती खोटी असल्याचं चारी उमेदवारांनी मला निक्षून सांगितलं. तरीपण खालच्या कार्यकर्त्यांशी चर्चा केली तेव्हा ह्याच हिशेबावर सारे आडाखे बांधले गेल्याचं, स्ट्रॅटेजीज आखल्या गेल्याचं मला समजलं. कॉंग्रेसच्या छावण्यातनं तर ह्या गणितानंच आ. सावंतांच्या विजयाचं कोष्टक मांडून मला दाखवलं गेलं. अर्थात खुद्द उमेदवार, पालक मंत्री अंतुले किंवा अन्य कुठल्याही जबाबदार कॉंग्रेस (नव) नेत्यानं असे उद्गार काढले नाहीत. दोन आग्री उमेदवारात (श्री. दत्ता पाटील व श्री ए. टी. पाटील) विभागली जाणारी मतं, भाई शेट्यांमुळे कॉंग्रेसकडे ओढली गेलेली काही मत व मुस्लमांचा पाठिंबा, ह्यावरच विजयाचं हे गणित आधारलेलं आहे. मात्र खुद्द कॉंग्रेसी नेते, ' एकीकडे श्रीमंतीच्या राशी व दुसरीकडे दरिद्री नारायण ह्यातनं दरिद्री नारायणाची निवड करून त्याच्या सेवेसाठी अधिक सामर्थ्य प्राप्त व्हावं म्हणून आम्ही ह्या रिंगणात उतरलो आहोत.' असंच सांगत आहेत. स्थानिक प्रश्नांवर त्यांचं मौन तरी आहे किंवा उडवाउडवीची तरी उत्तरं आहेत......

कुलाबा जिल्हा मतदार संघातले रागरंग हे असे आहेत. पण खरं सांगायचं तर अंतर्भागात अद्याप निवडणुकीचं वारंच पोचलेलं नाही असं मला आढळलं. आणि निवडणुकीत मतदानही तोकडंच होईल असं वाटतं. माझा अंदाज पन्नास ते पंचावन्न टक्क्यांचा. बसमधले सहप्रवासी, वाटेत भेटलेले काही खेडूत, टांगेवाले,

काही पत्रकार आदी जवळजवळ छत्तीस जणांना मी मुद्दाम विश्वासात घेऊन त्यांची मत अजमावली; त्याची नोंद करून घेतली. त्यातल्या थोड्या वरच्या पातळीतल्या लोकांना सोडलं तर, इतरांना उभे राहिलेले उमेदवार, त्यांचे पक्ष, त्या पक्षाचे जाहिरनामे वगैरे बाबतीत काही काही माहित नव्हतं. अशांचा आकडा ह्या छत्तीसात चोवीस होता. मी ज्यांचा वर उल्लेख केला त्यातले पाच जण महाडच्या सभेतले श्रोते होते; चौघे पनवेलचे, पाच जण अलिबागचे, तीन पेणचे, तीन ऊरणचे, दोघं पोयनाडचे, आणि बाकीचे वेगवेगळ्या प्रवासात भेटलेले कुलाब्यातलेच होते. ह्यांनी व्यक्तविलेलं मतदान पुढील प्रमाणे होतं— नवकाँग्रेस १४, शे. का. पक्ष १०, ए. टी पटील ८ व नानासाहेब कुटे ४. महाडला भेटलेल्या एका मुसलमानानं मोठं अफलातून वाक्य ऐकवलं. तो म्हणाला "नवकाँग्रेस अभी गायवाली बन गयी है। वह अब हिंदुवालीही बन गयी है; सब जातीवाली नही।" त्याने अर्थातच आपलं मत शे. का. पक्षाला असं मला उघड उघड सांगितलं.

वर व्यक्त झालेला मतदानपट संपूर्णपणे प्रतिनिधिक कदाचित ठरणारही नाही. परंतु एकंदर विचार करता मतदान बऱ्याच अंशी ह्याच धर्तीवर होईल असं मला वाटतं. ह्याची माझ्या मते कारणं पुढीलप्रमाणे आहेत—

१. श्रीमती इंदिरा गांधींच्या आवाहनांनी व आव्हानांनी सामान्यजनावर घातलेली भुरळ मोडून काढन सत्य त्यांना सांगण्याइतपत अवधिच विरोधी पक्षांना मिळालेला नाही.

२. शे. का. पक्षाविरुद्ध ए. टीं. च्या स्वरूपात उभा असलेला बराचसा तुल्यबळ उमेदवार. ते शे. का. पक्षाची मतं तर खातीलच, परंतु त्याचबरोबर शिवसेनेच्या पाठिंब्यामुळे आणखीही बरीच मतं कुंटयांची व शे. का. प.ची हडप करतील.

३ मागच्या १९६७ च्या निवडणूकीत कुटयांचीही बरीच मतं शे. का. प.च्या 'खटाऱ्यात' आली होती. ही मतही ह्यावेळी कुंटयांकडेच वळणार व त्यातही शेकाप घसरणार.

४. ताज्या 'हवाई-हरण' प्रकरणामुळे मुसलमान मत एकगठ्ठा नवकाँग्रेसला मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अर्थात हा माझा कयास आहे. निवडणुका अटातटीची होणार आहे. कुणीही निवडून आलं तरी ७–८ हजारांपेक्षा अधिक मताधिक्य मिळवू शकणार नाही. शांत, निसर्गसुंदर कुलाबा जिल्हा निवडणुकांनी घुसळून निघणार आहे. त्यातनं काय बाहेर पडतं ते समजेलच.....

## पै. मारुती माने आणि विश्वनाथसिंग

# एक बेचव लढत

आवडत्या नटाच्या सिनेमाचा पहिला खेळ न चुकता बघणाऱ्या प्रेक्षकाप्रमाणे मारुती मानेची कुठलीही कुस्ती न चुकता पहिल्या रांगेत बसून मी बघत आलो आहे.

याची सुरुवात झाली नऊ वर्षांपूर्वी बसलिंग करजगी आणि मारुती मानेच्या कुस्तीची हवा त्यावेळी सांगलीत चांगलीच तापली होती. ऐन सार्वत्रिक निवडणुकीच्या धामधुमीचा तो काळ. पण उमेदवार आणि राजकारण यापेक्षा पहिलवानांची तयारी आणि कुस्तीचा निकाल याचीच चर्चा अधिक व्हायची. बसलिंग सांगलीचा. आदल्याच वर्षी त्याने मारुतीला अस्मान दाखविले होते आणि आम्हानाची म्हणून कुस्ती परत ठरली होती.

परीक्षा तोंडावर असूनही मोठ्या कुतुहलाने मी त्या कुस्तीला गेलो. सांगली भाग हा कोल्हापूरसारखाच कुस्तीवेडा. टांगेवाल्यापासून मोटारमालकापर्यंत आणि शिपायापासून साहेबापर्यंत साऱ्यांच्या तोंडून जुन्या मैदानांचे किस्से, या लढतीचे भविष्य, मेहनतीची आणि खुराकाची रंगतदार वर्णने ऐकून 'ना मिळे अशी मौज पुन्हा पहाया नरा' अशी माझी कल्पना झाली होती. पाण्याची मोट दोन बैलांना बाजूला सारून स्वतः ओढणाऱ्या मारुती मानेची अंदमाप ताकद आणि डावाला हुशार असलेल्या बसलिंगचे कौशल्य यात कोण वरचढ ठरणार याच्या असंख्य पैजा लागल्या होत्या.

मारुतीचे नाव त्यावेळी अर्थातच आजच्या एवढे झालेले नव्हते पण पैलवान स्थानिक भागातले असले, लढत अटीतटीची, आव्हानाची आणि खरोखरच निकाली असली, जोड काटा-जोड असला की मैदानाला कशी गर्दी उसळते हे मी त्यावेळी अनुभवले. पंच कोण होते ते आठवत नाही पण सरपंच होते सांगली जिल्ह्याचे

लाडके नेते आणि त्यावेळचे विधानसभेचे उमेदवार वसंतरावदादा पाटील. त्या प्रचंड गर्दी आणि गोंधळात मागच्या लोकांना काही नीट दिसेना. मग त्यांनी चालू केले छोटे छोटे दगड मागून फेकण्याचे उद्योग. त्यात वसंतरावदादाच नेमके किरकोळ जखमी झाले. दगड डोळ्याच्या जरा खाली बसला म्हणून नशिब !

शेवटी मारुती माने आणि बसलिंगची जोडी मैदानात उतरली. एकमेकांना खाली घेण्याचे प्रयत्न, थोडी खडाखडी थोडी चिडाचिडी हे सारे पहिल्या वीसपंचवीस मिनिटात झाले. मग मारुतीने घीस्सा मारला. डाव पूर्णपणे लागला नाही. लढत कोपऱ्यात गेली होती. पंचांनी ती सोडविली आणि पैलवानांना मधे आणीत असतानाच मारुतीने हिसका मारून हात सोडवून घेतला आणि दक्षिणेच्या बाजूला बसलेल्या ' आपल्या ' प्रेक्षकात उडी घेतली. कुस्ती निकाली झाली नव्हतीच. पुनः पुनः माईकवरून मारुतीला बोलवण्यात आले पण तो मैदानात असेल तर ना ! मैदान मारल्याच्या अविर्भावात तो आपल्या चाहत्यांच्या खांद्यावरून मैदान सोडून केव्हाच गावातल्या मिरवणुकीत सामील झाला होता. बसलिंग खुद्द सांगलचा ! अधिक प्रेक्षक त्याच्या बाजूचे. बसलिंग मैदान सोडेना. त्याला विजयी जाहीर करा म्हणून त्याच्या पाठीराख्यांनी पंचांच्याकडे तगादा लावला. पंच गोंधळले. त्यांनी सरपंचाकडे बोट दाखविले. वसंतरावदादांच्यावर ही नसती आपत्ती आली. त्यांना वाटले होते मामला साधा सरळ असेल पण ही नसतीच पंचाईत. मिरवत चाललेल्या मारुती मानेला पराभूत ठरवायचे तर कवठेपिरान गावची मते मिळणार कशी ? तो त्या गावचा राजाच. आणि सांगलीकर मंडळींना तरी दुखवून कसे चालेल ? धरले तर चावते सोडले तर पळते असा वैताग. फुकटचा जनतासंपर्क पुढाऱ्यांना कधी कधी नडतो तो हा असा.

मोठा गाजावाजा केलेली आणि लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या उपस्थितीत सार्वत्रिक निवडणुकीच्याच सावळ्या गोंधळात जाहीर झालेली मारुती मानेची जी कुस्ती विश्वनाथ बरोबर ज्या पद्धतीने पार पडली त्यावेळी सांगलीच्या लढतीची आठवण न झाल्यास नवल. अर्थात एक महत्वाचा फरक होताच. वर्तमानपत्रे आणि जाहीराती यातून कितीही तुल्यबळ लढतीचा आभास निर्माण केला तरी ही लढत मारुतीच जिंकणार याबद्दल कोणत्याही जाणकारात दुमत नव्हते. खऱ्या अर्थाने मारुतीला जोड होऊ शकेल असा एकच मल्ल सध्या भारतात आहे हे कुस्तीतज्ञ जाणतात. सामान्य प्रेक्षकाला काही वेळा हे समजत नाही आणि समजले तरी आदतसे मजबूर असलेला शौकिन भरमसाठ दर्जाची तिकिटे काढूनही कुस्तीला गर्दी करतोच. (त्याचा हा वीक पॉईंट ठेकेदारांनी चांगला ओळखला आहे.) ठीक साडेसहाला दोन्ही मल्ल आखाड्यात उतरले. मारुतीचे पोट आता बरेच सुटले आहे तरीही त्याचे बाकीचे शरीर व्यायामाचे आणि कसाचे वाटते. सर्वसाधारणपणे भारतीय मल्ल जो पळण्याचा व्यायाम घेतच नाहीत तो नियमितपणे घेत असल्याचा

फायदा मारुतीला निश्चितच झाला आहे. पहिले वीस मिनटे झाली फक्त खडाखडी. अशाच खडाखडीनंतर थपडाथपडी होऊन पद्धतशीरपणे कुस्ती अर्धवट टाकूनच मैदानातून पाय काढलेल्या सादिक पंजाबी आणि श्रीरंग जाधवाच्या मुंबईच्याच कुस्तीची मला आठवण झाली. पण एकविसाव्या मिनिटाला मारुतीने पट काढून विश्वनाथला खाली घेतले. कुस्ती मैदानाच्या बाजूला बांधलेल्या रस्सीजवळ गेली. पंचांनी पुन्हा दोघांना सोडवून आत आणले. यानंतर पुन्हा नऊ मिनटानी आणि नतर वत्तीसाव्या मिनटाला मारुतीने विश्वनाथला पट काढून खाली घेतले. तिसऱ्यांदा पट काढून खाली घेतल्यानंतर पुन्हा पंचानी दोघांना सोडवून मध्ये आणले. ते पुन्हा लढत चालू करून देणार त्यावेळीच बेसावध असलेल्या मारुतीला खाली घेऊन एका बगलेवर दाबण्याचा विश्वनाथने प्रयत्न केला आणि तो थोडा यशस्वी होताच कुस्ती जिंकल्याच्या अविर्भावात आखाड्यातून उडी मारून तो बाहेर पडला. गंमत म्हणजे पंच रामचंद्र चव्हाणही त्याच्यापाठोपाठ बाहेर पडले. निकाल न देताच जणू काही कुस्ती संपली. मारुती माने अजून आखाड्यात उभा होता. थोडा चिडलेला. विश्वनाथला आत यावयास सांगा चितपट मारतो असे सांगत होता. प्रेक्षकांचा गोंधळ वाढला त्यावेळी विश्वनाथला माईकवरून पुकारण्यात आले. अपेक्षेप्रमाणे तो आला नाहीच आणि मग मारुतीचा विजय घोषित झाला. ऑलंपिकला चौथा नंबर मिळवलेल्या विश्वंभरसिंगची मागच्या वर्षी संभाजी पारगावकरशी मुंबईलाच कुस्ती झाली होती. आणि पहिल्या दीड मिनटातच कुस्ती मारल्याच्या थाटात संभाजी बाहेर आला होता. त्याला सक्तीने पुन्हा आत नेवून कुस्ती खेळावयास लावली होती. पण असे काही करायचे तर कुस्ती जाहिरातीत लिहिल्याप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत खरोखरीच बेमुदत निकाली करावयाची ठेकेदारांची तयारी हवी ना? नाहीतर सारा दिवस आणि बरेचसे पैसे घालवून प्रेक्षकांच्या पदरात येते बेचव लढत आणि अपेक्षाभंग.

कुस्ती बेमुदत निकाली होईल हे पहावयास हवे तसेच ती काटा जोडच असेल हे दक्षताही घ्यावयास नको का? नाहीतर मग एका चांगल्या पहिलवानाच्या नावावर शौकिनांना उकळण्याचा तो धंदाच होऊन बसतो. हजारो रुपये मिळत असल्याने पहिलवानही ह्या बनावात खुशीने सामील होतात.

मारुती माने गेल्या काही वर्षात विलक्षण गाजला आहे. वाढला आहे. बसलिंग करजगेच्या कुस्तीनंतर त्याने महमद हनीफला हरवले. अवघ्या पस्तीस मिनटात दमामध्ये साफ उखडून हनीफ बेजोड ठरून चित झाला. त्यानंतर कुठे विष्णु सावर्डे मारुतीबरोबर कुस्ती खेळावयास तयार झाला. आत साठसत्तर हजार प्रेक्षकांची गर्दी आणि बाहेर तेवढाच तिकीट न मिळालेला जनसमुदाय. ही कुस्ती मात्र खरोखरच बेमुदत लढविली गेली. तब्बल तीन तासाच्या लढतीनंतर मारुतीने सावर्डेला अस्मान दाखविले. प्रेक्षकांच्यात बसलेल्या मंत्र्यांचे निरोप येवूनही ही

कुस्ती सोडविली गेली नाही हे विशेष. त्यानंतर मारुती हिंदकेसरी झाला. मागच्या वर्षी त्याने हिंदकेसरी हजरत पटेल आणि मग सादिक पंजाबी या दोघांच्यावरही एकाच वर्षात मात केली आणि आपले श्रेष्ठत्व निर्विवाद राखले. एवढया मोठया पहिलवानाने कुठे कोणी पंजाबवाला अथवा कोणी लष्करातला सिंग अशा कुस्त्या करण्यात आणि त्या जिंकण्यात विशेष ते काय ? त्याला लढतीला आता दोनच मल्ल खरे राहिले आहेत. एक सादिक पंजाबी आणि आंदळकरला सहजपणे अस्मान दाखविणारा पाकिस्तानचा गोगा अथवा भारत केसरी चंदगीराम.

चंदगीरामबरोबर मारुतीची बेळगावला काही वर्षांपूर्वी झालेली लढत बरोबरीत सुटली होती – तीन तासानंतर. चंदगीरामने भारत केसरी हा बहुमान दोनदा मिळवला आहे. या मानाच्या फडातही मारुतीने कधीच का उतरू नये ? सादिक पंजाबीबरोबर मागीलवर्षी दुर्दैवाने चंदगीराम हरला असला तरी वीस मिनटाच्या लढतीतही चंदगीरामने सादिकची दमछाक करून स्वतःचे प्रभुत्व साऱ्यांना पटविले होते. हिंदकेसरी आणि भारतकेसरी यांची ही लढत हेच खरे मारुतीला आज आव्हान आहे. निदान भारतापुरते तरी !

मुंबई शहर तालीमसंघाच्या मान्यतेनी काही ठेकेदारांनी हे मैदान भरविले होते. या साऱ्या प्रकारातील अंदरकी बात आणि स्वार्थी राजकारणी गोंधळ लवकरच या सदरातून वाचकांच्या पुढे येईलच.

□ □ □

---

मारुती मानेची गोगा अथवा चंदगीरामशी कुस्ती ठरवण्याचे घाटत आहे. या एप्रिल मे मध्ये. मारुती हा अत्यंत गरिबीतून वर आलेला मल्ल. आज त्याच्याजवळ अत्यंत चांगल्या प्रतीची तीस-चाळीस एकर जमिन आहे. प्रत्येक गाजलेल्या कुस्तीनंतर त्या पैशातून तो थोडी जमीन खरेदी करतो आणि त्याचे मित्र त्या शेताला त्या हरलेल्या पहिलवानाचे नाव देतात. असे चंदगी-राम शेत अथवा गोगा शेत मारुतीला मिळेल काय ?'

चंदगीराम हा आहे चित्रकला शिक्षक. पहिलवानी पेशाला अत्यंत विसंगत अशा अनेक गोष्टी त्याच्यात आहेत. त्याचे लग्न होऊन सुमारे आठ वर्षे झाली आणि त्याला दोन मुले आहेत. तो फक्त शाकाहारी आहे आणि त्याचे कुस्तीसाठी मैदानात येणे आणि जिंकल्यावर बाहेर पडणे हे तो अतिशय थंडपणे करतो.

---

पृष्ठ ७ वरून

रिपब्लीकन पक्ष निवडणूक लढवित असल्यामुळे कम्युनिस्टांची मते निदान पंचविस हजारानी कमी होतील; हे उघड आहे. हे निदान पंचवीस हजार म्हणण्याचे कारण असे की, या ठिकाणी रिपब्लीकन पक्ष नेते उजव्या कम्युनिस्टांना पाठींबा देणार आहेत. संघटना, व अनुयायी हे अर्थातच मान्य करू शकत नाहीत. त्यामुळे ते आपल्या उमेदवाराचा प्रचार करणार आहेत. ही जागा आपली हक्काची समजून उजवे व डावे कम्युनिस्ट असे दोघेही निवडणूक लढवित आहेत. दोन तालुक्यात उजव्या कम्युनिस्टांचे काम आहे. इतरत्र डाव्यांचे काम आहे. प्रमुख कम्युनिस्ट मतदान डाव्या कम्युनिस्टांचे असल्यामुळे उजवे कम्युनिस्ट कॉ. काशीनाथ जाधव निवडून येण्याचा संभव मुळीच नाही. पण त्याबरोबरच डाव्या कम्युनिस्टांच्या मताला तीस, चाळीस हजार मतांचे अजून एक खिंडार पडल्यामुळे त्यांचेही उमेदवार कॉ. बुरांडे निवडून येण्याची शक्यता नाही. संघटना कॉंग्रेस, जनसंघ आदींनी या मतदार संघात आपापल्या अनामती संभाळल्या तर त्यांचा फार मोठा विजय होईल इतकेच. येथील कॉंग्रेस उमेदवार श्री. सयाजीराव पंडित हे या मतदार संघातून फारसे कष्ट न पडता प्रचंड मतांनी विजयी होणार ही गोष्ट आता ठरून गेल्यात जमा आहे.

उस्मानबाद जिल्ह्यात एक जागा तर राखीव मतदार संघात गेलेली आहे. या भागात शे. का. पक्षाचे काम पुष्कळ आहे. या पक्षाचे कार्यकर्ते उद्धवराव पाटील यांच्या विषयी सर्व समाजात भरपूर आदर आहे. ते स्वतः जर निवडणूक लढवित असते तर कदाचित ही जागा शे. का. पक्षानेच जिंकली असती. शे. का. पक्षाला मोठ्या प्रमाणात मते रिपब्लीकन पक्षाची पडत असतात. या वेळेला त्या पक्षाचा उमेदवार असल्यामुळे ती मते मिळण्याचा संभव कमी आहे. परिणामी शे. का. पक्ष आणि रिपब्लिकन पक्ष अशी मत मतविभागणी झालेली असल्यामुळे तुलनेने सत्तारूढ कॉंग्रेसचे उमेदवार तुळशीराम पाटील यांची परिस्थिती बळकट झालेली आहे. हा उमेदवार म्हणजे कॉंग्रेस पक्षाचे त्या भागातील मोठेसे प्रस्थ नाही. म्हणून कुणी उमेदवाराचा फार मोठा वैरीही नाही. स्वतः शे. का. पक्षाची शक्ती परभणीत खर्ची पडणार असल्यामुळे व ती जागा पक्षाच्या दृष्टीने प्रतिष्ठेची असल्यामुळे येथे विरोधी पक्ष फारसा नेट धरण्याच्या मनोवृत्तीत नाहीत. पुरेशा बहुमताने ही जागा काँग्रेस पक्षच जिंकेल

परभणी येथून श्री. आण्णासाहेब गव्हाणे शे. का. पक्षाच्या वतीने निवडणूक लढवित आहेत. अण्णासाहेब गव्हाणे हे शे. का. पक्षाचे जुने व जेष्ठ नेते. बहुजन समाजात त्यांचे वजनही मोठे. ते येथून निवडणूक लढवित आहेत. मराठवाड्यातील शे. का. पक्षाचे कार्यकर्ते ही जागा प्रतिष्ठेची समजून तेथे गेलेले आहेत. गव्हाणे यांना रिपब्लीकन पक्ष, सं. सो. पा. यांचाही पाठिंबा आहे. या मतदार संघात

संघटना कॉंग्रेसचे उमेदवार अॅडव्होकेट निकुंभ परभणी जिल्ह्यातील अंतर्गत पाटील गटाच्या पाठिंब्यावर उभे आहेत. सत्तारूढ कॉंग्रेसचे उमेदवार शिवाजीराव देशमुख हे तरुण व बुद्धिमान कार्यकर्ते जरी असले तरी स्थानिक राजकारणातील भानगडी-मुळे त्यांना पक्षातूनच फार मोठा विरोध आहे. त्यामुळे या वेळी परभणीची जागा विरोधी पक्ष जिंकण्याचा संभव फार वाढलेला आहे. शेवटच्या क्षणी फार मोठा नेट लावला तर कॉंग्रेस पक्ष या मतदार संघात चार पाच हजार मतांनी जिंकण्याचा हरण्याचा संभव आहे. एरव्ही परिस्थिती आजचीच राहिली तर येथे सत्ता-रूढ पक्षाला पराभव पत्करावा लागेल.

मराठवाड्यातील राहिलेली शेवटची जागा म्हणजे नांदेड लोकसभेची जागा होय. गेल्या निवडणुकीत तेथून रिपब्लीकन उमेदवार उभा होता. त्याला सर्वपक्षीय पाठींबा होता. ही जागा त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीने लढविलेली होती. एवढा सगळा एकमुखी पाठिंबा असून त्या वेळी रिपब्लिकन उमेदवाराला एक लक्षाहून कमी मते पडली. आता रिपब्लिकन पक्षात दोन गट झालेले आहेत. त्याच परिणाम भय्यासाहेब आंबेडकर यांना भोगावा लागणार असे दिसते. दर वेळेप्रमाणे गणपतराव वाघमारे तेथून अपक्ष म्हणून उभे आहेत. ते मुळत: जुन्या श्यामसुंदर पक्षाचे म्हणजे नव्या भीमसेना पक्षाचे कार्यकर्ते आहेत. पंचवीस हजार मते गोठून टाकणे हे त्यांचे काम. जोपर्यंत कॉंग्रेस त्यांची सोय करीत नाही तोपर्यंत ही पंचवीस हजार मते कॉंग्रेसला मिळणार नाहीत. उलट या वेळी भय्यासाहेबांची काही मते हा उमेदवार हस्तगत करण्याचा संभव आहे. या मतदार संघातून जनसंघाचे लक्ष्मण-राव गजेवार हेही निवडणूक लढवित आहेत. पूर्वीच्या मानाने जनसंघाची शक्ती आता वाढलेली आहे. त्यामुळे या उमेदवारास तीस हजाराच्या आसपास मते पड-तील असा अंदाज आहे. अर्थातच या मतदार संघातून सत्तारूढ कॉंग्रेस पक्षाचे श्री व्यंकटराव तरोडेकर हे निवडून येणार यात वादच नाही. ना. शंकरराव चव्हाण व श्री शामरावजी कदम या दोघांच्याही प्रतिष्ठेची असणारी ही जागा प्रचंड बहु-मताने निवडली गेली पाहिजे असा पक्षाचा प्रयत्न चालू आहे, पण त्या प्रयत्नाला फारसे यश येण्याचा संभव नाही. ही जागा खासदार तरोडेकर पुन्हा एकदा पुरेशा बहुमताने म्हणजे पन्नास ते साठ हजार मताने जिंकतील, असा जाणकारांचा अंदाज आहे.

या वार्तापत्राप्रमाणे पाच जागा सत्तारूढ कॉंग्रेस पक्ष निश्चितपणे जिंकील असे म्हटले गेले आहे. एक जागा आणखी सत्तारूढ पक्ष जिंकील आणि परभणीची एक जागा विरोधी पक्ष हस्तगत करील असा अंदाज आहे. अर्थातच या सर्व अंदाजाचे आधार आपले आवडते नावडते पक्ष हा नाही. कोण निवडून यावे असे वैयक्तिक मत जर विचारले तर कदाचित त्यांची उत्तरे अतिशय निराळी येतील. प्रश्न आपल्या इच्छा अनिच्छांचा नाही. अनुमान कुणी निवडून यावे याबाबत आहे, इतके जर ध्यानात ठेवले तर प्रचार वजा जाता खाजगीत बहुतेक पक्षांच्या कार्यकर्त्यांशी चर्चा करून व परिस्थितीची माहिती घेऊनच ही अनुमाने दिली आहेत. □ □ □

दक्षिण मुंबईतून

## जॉर्जने

निवडणूक लढवू नये म्हणून

# दहा लाखांची ऑफर!

गौप्यस्फोट करणारी मुलाखत

## माणूस

पुढील अंकी

**शनिवार**

**२७ फेब्रुवारी १९७१**

**चाळीस पैसे**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649

ंचित जाऊं ! शुभास्ते पंथानः




" सरकार निवडणूक प्रचारासाठी शासन यंत्रणेचा गैरवापर करीत आहे हा मुद्दा नेहमीप्रमाणे आताही ठणकावून मांडलात. अहो, पण ह्या राज्यात आपल्या पक्षाचं सरकार आहे हे विसरलात ? ... "